



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २० सप्टेंबर २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३५२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## शॉक बसून कोसळल्याने वृद्ध इसमाचा मृत्यू

**सोलापूर** : हाताला शॉक बसून कोसळल्याने ६३ वर्षीय वृद्ध इसम जखमी होऊन मरण पावला. ही दुर्घटना अक्कलकोट रोडवरील तुळजाभवानी नगरात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. प्रकाश कृष्णा सोनवणे (वय ६३ रा. तुळजाभवानी नगर) असे मयताचे नाव आहे. मंगळवारी दुपारी एक वाजेच्या सुमारात घरात काम करीत असताना त्यांच्या उजव्या हाताला शॉक बसला. त्यावेळी ते खाली कोसळले. डोक्यास मार लागल्याने ते बेशुद्ध झाले होते. शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. हवालदार पोळ पूढील तपास करीत आहेत.

# धक्कातंत्र!

# लोकशाहीच्या मंदिरात दिसणार 'नारीशक्ती'ची 'वज्रमूठ'

## अडगळीत पडलेल्या महिला विधेयकाला अखेर फुटले पाय

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**भारतातील 'नारीशक्ती'ला श्रीगणेश पावणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून लोकसभेच्या सभागृहात अडगळीत पडलेल्या महिला आरक्षण विधेयकाला अखेर पाय फुटले. लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेच्या नव्या सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने हे विधेकय मांडले आहे. त्यावर मंगळवारी बरीच चर्चा झाली. सत्ताधारी भाजप आणि विरोधी काँग्रेस यांच्यात यावरून खडाखडी झालीच. या विधेयकाला एकमताने मान्यता देण्याचे आवाहन मोदी यांनी केले आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर हे विधेयक आणून मोदी सरकारने सर्व विरोधी पक्षांची कोंडी केली आहे. आता या विधेयकाला विरोध केल्यास निवडणुकीत आपले तोंड भाजून निघेल,ही भीती विोधी पक्षांना लागून आहे. त्यामुळे हे विधेयक मंजूर होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास भविष्यात संसदेच्या नव्या सभागृहात 'नारीशक्ती'ची 'वज्रमूठ' पहायला मिळेल.**

मंगळवारी गणेश चतुर्थीच्या मुहुर्तावर नव्या संसद भवनात कामाचा शुभारंभ झाला. नव्या संसद भवनातून पंतप्रधान मोदींनी महिला आरक्षण विधेयकाची घोषणा केली. कुणालाही थांगपत्ता लागू न देता केंद्रीय मंत्रीमंडळाने महिला आरक्षण विधेयकाला मान्यता देवून जबरदस्त धक्का दिला. महिला आरक्षण विधेयकासंदर्भात केलेली घोषणा ही नव्या संसद भवनात मोदींनी केलेली पहिली मोठी घोषणा आहे.

मोदी म्हणाले की, अटलजींच्या कार्यकाळात अनेक वेळा महिला आरक्षण विधेयक आणले गेले. पण ते विधेयक मंजुर करण्यासाठी डेटा गोळा करता आला नाही आणि त्यामुळे अटलजींचे स्वप्न अपूर्णच राहिले. महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या शक्तीला आकार देण्याचे काम करण्यासाठी देवाने मला निवडले आहे. पीएम मोदींनी महिला आरक्षणाला 'नारी शक्ती वंदन कायदा' असे नाव दिले आहे.

१९ सप्टेंबर ही तारीख इतिहासात अजरामर झाली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया झपाट्याने प्रगती करत आहेत आणि नेतृत्व करत आहेत, त्यामुळे आपल्या माता-भगिनींनी, आपल्या स्त्रीशक्तीचा धोरणनिर्मितीत सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे. जास्तीत जास्त योगदान द्या. फक्त योगदानच नाही तर महत्त्वाची भूमिका बजावा असेही ते यावेळी म्हणाले.

### लोकसभा-विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण

महिला आरक्षण विधेयकांतर्गत विधानसभेच्या ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील. याशिवाय लोकसभेतही महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे. म्हणजेच, १८१ जागा महिलांसाठी राखीव असतील. तसेच, दिल्ली विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे.

### महिला खासदारांची टक्केवारी किती?

सध्याच्या लोकसभेत ७८ महिला खासदार आहेत, जे प्रमाण एकूण ५४३ च्या १५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, ओडिशा, सिक्कीम, तामिळनाडू, तेलंगणा, त्रिपुरा आणि पुद्दुचेरीसह अनेक राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व १० टक्क्यांहूनही कमी आहे. दरम्यान, गेल्या काही आठवड्यात काँग्रेस, बीजू जनता दल आणि भारत राष्ट्र समितीसह अनेक पक्षांनी महिला आरक्षण विधेयक आणण्याची मागणी केली आहे.



### महिला आरक्षणाचा प्रवास

- १९९१ मध्ये महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण लागू झाले.
- १९९६ मध्ये हे महिला आरक्षण लोकसभा, विधानसभेतही लागू करण्याचा पहिला प्रयत्न.
- त्यानंतर वाजपेयींच्या काळातही हे विधेयक आणण्याचा प्रयत्न, मात्र संख्याबळ अपुरे.
- २०१० मध्ये यूपीए सरकारच्या काळात हे विधेयक राज्यसभेत मंजूर, पण लोकसभेत संख्याबळ नसल्यानं तिथे मंजूर होऊ शकले नव्हते.
- संसदेच्या नव्या इमारतीत ऐतिहासिक विधेयकानं कामकाजाचा श्रीगणेशा झाला आहे. आता महिला आरक्षण प्रत्यक्षात लागू व्हायला २०२९ उजाडणार का हे पाहायचे आहे.

### विधेयकातले ठळक मुद्दे

- या आरक्षणामुळे महिलांची संख्या लोकसभेत किमान १८१ वर पोहचेल असे कायदामंत्री म्हणाले.
- या आरक्षणात पोटआरक्षणही असणार आहे, ३३ टक्के पैकी काही जागा एससी, एसटी वर्गाच्या महिलांसाठी आरक्षित असतील.
- हे विधेयक मंजूर झाल्यानंतरच्या पहिल्या जनगणनेच्या आधारे जी पुनर्रचना होईल तेव्हा हे आरक्षण लागू होईल. म्हणजे २०२४ च्या निवडणुकीला हे आरक्षण लागू होणार नाही हे जवळपास स्पष्ट आहे.
- हे आरक्षण १५ वर्षांसाठी असेल असं विधेयकात म्हटलं आहे. पण एस सी, एस टी आरक्षणाप्रमाणे हे आरक्षणही नंतर वाढत राहू शकते.



सोलापुरात मंगळवारी गणरायाचे उत्साहात आगमन झाले. अय्या गणपतीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. तर अथर्व गणेश मंडळाच्या वतीने ढोल वादनाचे सादरीकरण करण्यात आले.

## ग्रीनरी उद्ध्वस्त करून महापालिका दीड कोटींचा चुराडा करणार

सुराज्य/सोलापूर



एकीकडे सोलापूर महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे भासवले जात आहे. मात्र गरज नसणारी अनेक कामे महापालिकेकडून केली जात असल्याचे दिसत आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम अर्थात एनकॅप योजनेतून सोलापूर महापालिकेला २५ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. शहरातील धुळीचे प्रदूषण कमी व्हावे, जास्तीत जास्त ग्रीन बेल्ट तयार व्हावे हा अभियानाचा उद्देश आहे. मात्र आलेले पैसे नाविन्यपूर्ण योजनेऐवजी नको असलेल्या कामावर खर्च करून या बहुतांश पैशाची उधळपट्टी सुरू आहे.

सोलापूर शहरातील जुने पुणे नाका म्हणजेच छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यासमोर नॅशनल हायवेच्या माध्यमातून पुण्याकडे जाताना आणि तुळजापूरकडे जातानाच्या बाजूला झाडी लावून चौक ग्रीनरी युक्त करण्यात आला होता. विशेष म्हणजे याच नॅशनल हायवेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्याचा नामफलकदेखील या ठिकाणी आहे. मात्र इथली ग्रीनरी उद्ध्वस्त करून महापालिका तब्बल १ कोटी ६० लाख रुपये खर्च करून पुन्हा या ठिकाणी काम करत आहे.

वास्तविक पाहता हा चौक चांगला आहे. येथे झाडे देखील असताना आणि पेवर ब्लॉकद्वारे फूटपाथ कव्हर केले असताना इथली झाडी उद्ध्वस्त करून माती काढून आता पुन्हा याच ठिकाणी एनकॅप योजनेतून पेवर ब्लॉक टाकून फूटपाथ करणार आहे. ही पैशाची उधळपट्टी कशासाठी असा सवाल उपस्थित होत आहे.

### एन्ट्री पॉईंट अधिक चांगला करणार: आयुक्त

याबाबत पालिका आयुक्त शीतल तेली उगले यांना विचारले असता त्यांनी शहराचा हा एन्ट्री पॉईंट आहे आपण अधिक चांगला करणार आहोत असे मत व्यक्त केले. दुसरीकडे छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते छत्रपती शिवरायांचा पुतळा हा मार्ग अतिशय खराब झाला आहे याकडे लक्ष देण्याची मागणी केल्यांवर ते देखील काम आपण हाती घेणार आहोत, असे त्यांनी सांगितले.

## टाकळी सिकंदरच्या शिवारात तरूणाचा मृतदेह आढळला

सुराज्य/सोलापूर

मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथे एका शेतकऱ्याच्या शेतात मानवी मृतदेह आढळला आहे, मृतदेहाचे कपडे, चप्पल व खिशातील औषधाच्या गोळयावरून पोलिसांनी ओळख पटवली असून. सदरचा मृतदेह हा शंकर मारुती वाघमोडे (वय२८ रा पुळुज, ता पंढरपूर) याचा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

टाकळी सिकंदर येथील शेतकरी मनोहर दिगंबर चव्हाण (वय ६५) हे सोमवारी सकाळी आठ वाजता त्यांच्या शेतात पिकाला पाणी देण्यासाठी गेले होते. त्यांना त्यांच्या शेतात सर्वत्र दुर्गंधी सुटल्याचे कळले. जवळ जाऊन पाहिले असता अनोळखी मानवाच्या मृतदेहाचे भटकी कुत्री लचके तोडत असल्याचे आढळून आले.

यावेळी चव्हाण यांनी टाकळी सिकंदर येथील संतोष चव्हाण यांना याबाबत माहिती दिली व मोहोळ येथे येऊन पोलिसात खबर दिली.

पोलीस उपनिरीक्षक लोबो चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक मारूती लोंढे, यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता त्यांना मृतदेहाजवळ कपडे, चप्पल व खिशात औषधाच्या गोळ्या आढळून आल्या.

या प्रकरणी मनोहर चव्हाण यांनी मोहोळ पोलिसात खबर दिली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक लोबो चव्हाण हे करीत आहेत.

या अगोदर या परिसरातील कोणी व्यक्ती गायब झाली आहे का याची चाचपणी केली असता त्यांना दि.१३ सप्टेंबर रोजी मोहोळ पोलिसात एक इसम घरात कोणाला काही न सांगता निघून गेला आहे, अशी मिसिंग दाखल असल्याचे दिसून आले.

त्या अनुषंगाने तपास केला असता मृताची आई व पत्नीला बोलावून तो मृतदेह त्यांना दाखविला असता त्यांनी तो शंकरचाच असल्याचे ओळखले.

## सांगोला येथे दोन घरफोड्या; सवा लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर** : एकाच रात्री दोघांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने १ लाख २५ हजार रुपये किमतीचे दागिने पळविले. ही चोरी सांगोला येथील गावडे पेट्रोल पंपाच्या पाठीमागे सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली.


यासंदर्भात सतीश शंकर मदने (रा.सांगोला) यांनी सांगोला पोलिसात फिर्यादी दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. चोरट्याने सतीश मदने तसेच त्यांच्या घराजवळ राहणारे आनंदा वाघमोडे यांच्या बंद घराच्या कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. आणि दोघांच्या घरातील कपाटातून ४७ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेले. तपास स.नि.मोरे करीत आहेत.

## शास्त्रीनगर येथे गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : शास्त्रीनगर परिसरातील शानदार चौकाजवळ राहणाऱ्या अकबर बाबू शेख (वय ४५ ) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. सोमवारी रात्री दहाच्या सुमारास अकबर शेख याने घरातील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली. या मागचे कारण समजले नाही.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, यामुळेच उड्डाणपुलाची गरज पडली असेल का?

कल्याण
580-32-480

मुंबई
469-97-160

# सोलापूरसाठी उजनीतून पाच हजार क्युसेक्सने पाणी सोडण्यास प्रारंभ

सुराज्य/टेंभुर्णी

सोलापूर, पंढरपूर ,मंगळवेढा ,सांगोला आदी शहरे व भीमा नदी काठावरील गावे व वाड्यावस्त्यावरील नागरीक व पशुधनाच्या पिण्यासाठी म्हणून उजनी धरणातून ५ हजार क्युसेक्स विसर्गाने मंगळवारी १९ सप्टेंबर पासून पाणी सोडण्यास सुरुवात झाली असल्याची माहिती जलसंपदा सोलापूर विभागाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी दिली.

सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारे औंज टाकळी व चिंचपूर या बंधाऱ्यातील पाणीसाठा एक ते दोन ऑक्टोबरपर्यंत पुरेल असा अंदाज असून पुढील नियोजनासाठी उजनीतून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी केली आहे, त्याचप्रमाणे पंढरपूर मंगळवेढा व सांगोला आदी नगरपालिकांनी देखील पिण्याच्या पाण्यासाठी भीमा नदीत पाणी सोडण्याची मागणी केली आहे. उजनी धरण ते टाकळी बंधारा हे अंतर २३२ किलोमीटर अंतर असून पाच हजार क्युसेक्स विसर्गाने सोडलेले पाणी या बंधाऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी दहा ते अकरा दिवस लागतात. त्यानुसार नियोजन करून १९ सप्टेंबरला दुपारी दोन वाजल्यापासून प्रथम सोळाशे क्युसेक्स पाणी वीजनिर्मितीकक्षाद्वारे व सायंकाळपर्यंत धरणाच्या आठ दरवाजातून ३हजार४००क्युसेक्स याप्रमाणे एकूण पाच हजार क्युसेक्स पाणी भीमा नदी पात्रात सोडण्यास प्रारंभ केला असल्याची माहिती धरण नियंत्रण विभागाचे कनिष्ठ अभियंता प्रशांत माने यांनी दिली आहे.

पावसाळ्याचे तीन महिने संपले असले तरी समाधानकारक पाऊस नाही ,त्यामुळे उजनी धरणात सध्या फक्त २३ टक्के पाणी असून ७६ टीएमसी पाणीसाठा आहे व पाणी पातळी ४९२ मीटर असून येणारा विसर्ग फक्त ५९४ क्युसेक्स आहे .पिण्यासाठी म्हणून भीमा नदीत ११ दिवसात किमान पाच ते सहा टीएमसी पाणी सोडले जाणार आहे, त्याचप्रमाणे कालवा ,बोगदा ,सीनानदी ,सीना- माढा व दहिगाव योजना यांच्या लाभक्षेत्रातील गावे व वाड्यावस्त्यांना देखील पिण्यासाठी पाणी कमी पडू लागले आहे व त्यांच्यासाठी देखील पाणी सोडण्यात यावे अशी लाखो नागरिकांची मागणी होऊ लागली आहे. याबाबत जिल्ह्याच्या पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी विचार करून उजनी धरणाच्या सर्व विसर्गस्रोतातून तातडीने पाणी सोडावे अशी लाखो नागरिकांची जास्त मागणी होत आहे.

### कालव्यात पाणी न सोडल्याने संतापाची लाट

उजनीतून पाणी शिल्लक नसल्याचे कारण पुढे करत उजनी प्रशासनाने कालव्यात सोडण्यात येणार नाही असे जाहीर केल्याने शेतकऱ्यांत संतापाची लाट निर्माण झाली आहे.धरणात पुरेसे पाणी नसल्याचे कारण पाटबंधारे विभाग करत आहे. उद्योगधंद्यासाठी अहोरात्र पाणी चालू असताना शेतीसाठी पाणी का नाही उद्योगधंद्यासाठी वेगळे नियम आणि शेतीसाठी वेगळे नियम असे का ? असा सवाल शेतकऱ्यांतून विचारला जात आहे.

### सध्या उजनी धरणाची पाणीपातळी

- ▸▸ पाणी पातळी = ४९२.६९५ मीटर .
- ▸▸ एकूण साठा = २१५८.२१द .ल.घ.मी.
- ▸▸ उपयुक्त साठा = ३५५.२१ द.ल.घ.मी. .
- ▸▸ टक्केवारी = २३.४२%



# 'नारी शक्ती'चा विजय...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने गेल्या अनेक वर्षांपासून अडगळीत पडलेल्या महिला विधेयकाला मान्यता दिल्यामुळे संसदेच्या नव्या सभागृहात तसेच राज्यांच्या विधानसभेत आता पुरुष प्रधानकीची ताकत कमी होऊन नारी शक्तीची ताकत दिसायला लागेल. मोदी सरकारचे हे ऐतिहासिक पाऊल आहेच शिवाय हे विधेयक मान्य करण्याचे नैतिक धैर्य या सरकारने दाखवून दिले आहे. केंद्र सरकारने बोलावलेले संसदेचे विशेष अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले. हे अधिवेशन नेमके कशासाठी बोलावले आहे? असा प्रश्न विरोधकांकडून सातत्याने उपस्थित केला जात होता. परंतु, आता त्याविषयीचा उलगडा झाला. महिला आरक्षण विधेयक या अधिवेशनाचा केंद्रबिंदू असेल. सोमवारी रात्री केंद्रीय मंत्रिमंडळाची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. त्यात महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्यात आले. केंद्रीय मंत्रिमंडळाने अखेर लोकसभा आणि राज्यांतील विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षणाच्या बहुप्रतिक्षित विधेयकाला मंजुरी दिली. सोमवारी सकाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पत्रकारांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत संकेत दिले होते. संसदेच्या ७५ वर्षांच्या प्रवासावरील चर्चेची सुरुवात करताना लोकसभेतील भाषणातही मोदींनी महिला आरक्षणावर भाष्य करत संसदेतील महिला खासदारांच्या योगदानाचे कौतुक केले होते. हे कामकाज संपल्यानंतर पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महिला आरक्षण विधेयकाला मंजुरी देण्यात आली. काँग्रेससह बहुतांश विरोधी पक्षांनी महिला आरक्षणाला यापूर्वीच पाठिंबा जाहीर केला असल्यामुळे संसदेमध्ये या विधेयकाचा मार्ग सुकर असल्याचे मानले जात आहे. विरोधी पक्षांचे खासदार ही मागणी करत असताना केंद्र सरकारने यावर



भूमिका स्पष्ट केली नव्हती. त्यानंतर रात्री केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विधेयकाला मंजुरी देण्यात आली. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये सध्या महिला सदस्यांनी संख्या केवळ १४ तर विविध राज्यांच्या विधानसभांमध्ये सरासरी १० टक्के इतकीच आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहात महिला सदस्यांचे प्रमाण दोन टक्क्यांवरून २८ टक्क्यांवर पोहोचले आहे. ब्रिटनमध्ये तीन टक्क्यांवरून ३३ टक्के झाले. त्यामुळे भारतातही महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याची गरज व्यक्त केली जात होती. १९५२ मध्ये पहिल्या लोकसभेत महिला खासदारांचे प्रमाण केवळ पाच टक्के इतके होते. सप्टेंबर १९९६ मध्ये भारताचे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या कार्यकाळात हे विधेयक ८१ वी घटनादुरुस्ती विधेयक म्हणून लोकसभेत पहिल्यांदा मांडण्यात आले होते. लोकसभेत हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही आणि त्यानंतर या विधेयकाला संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले. या समितीने डिसेंबर १९९६ मध्ये त्यांचा अहवाल दाखल केलेला होता. या विधेयकावर चर्चा होण्यापूर्वीच लोकसभा विसर्जित झाली आणि हे विधेयक रद्द झाले. त्यानंतर बाराव्या लोकसभेत माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने हे विधेयक पुन्हा एकदा लोकसभेत मांडले. तत्कालीन कायदामंत्री एम. थंबिदुराई यांनी हे विधेयक संसदेत सादर केले आणि राजद (राष्ट्रीय जनता दल)चे एक खासदार लोकसभेच्या हौद्यात आले आणि त्यांनी या विधेयकाची प्रतच फाडून टाकली. त्याहीवर्षी या विधेयकाला खासदारांचे समर्थन मिळवता आले नाही. विशेष म्हणजे काँग्रेस, भाजप आणि डाव्या पक्षाच्या अनेक सदस्यांचा पाठिंबा असूनही या विधेयकाला मंजुरी मिळू शकली नाही. २००८ मध्ये, मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने हे विधेयक राज्यसभेत मांडलं आणि ते ९ मार्च २०१० रोजी १८६ विरुद्ध १ मतांनी हे विधेयक मंजूरही झालं. मात्र लोकसभेत मांडण्याकरता हे विधेयक कधीही यादीत घेतलं गेलं नाही आणि पंधराव्या लोकसभेच्या विसर्जनाबरोबरच हे विधेयकही विसर्जित झालं. त्यावेळी लालू प्रसाद यादव यांचा राजद, जदयू (जनता दल युनायटेड) आणि समाजवादी पक्षाचा या विधेयकाला प्रामुख्याने विरोध होता. मोदी सरकारने हे विधेयक पारित करून विरोधकांची हवाच काढून घेतली. भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी विरोधकांचा इंडिया नावाने नवा चेहरा पुढे आला. हे विधेयक पारित करून मोदींनी भाजपची खुंटी मजबूत केली आहे. डावे, सपा आदी पक्षांनी विरोध केल्यानंतर काँग्रेसने मौन बाळगले होते. डॉ. सिंग यांच्या १० वर्षांच्या सत्तेत डावे आणि सपाचा पाठिंबा होता. त्यामुळे काँग्रेस गप्प होती. हे सत्य नाकारताच येणार नाही.

## सामाजिक

# शासकीय अपरिहार्यता...

सत्य हे कडू औषधासारखे असते. औषध एकतर रोग बरा करते किंवा रोगाच्या वेदना सुसह्य करते. हा लेख वाचल्यावर त्यावर संमिश्र प्रतिक्रिया येतीलच किंवा घरी विचारल्याशिवाय सांबाराची काडी न आणणारे समाज माध्यमावर मात्र हिरीहिरीने निषेध वगैरे नोंदवतील हे बघणे फार गंमतीशीर असेल. उत्तम आकलन शक्ती असणाऱ्या व्यक्ती विचारांवर चर्चा करत असतात. मध्यम आकलन शक्ती असणाऱ्या व्यक्ती घटनांवर चर्चा करत असतात आणि कमी आकलन शक्ती असणाऱ्या व्यक्ती लोकांविषयी चर्चा करत असतात. हा मंत्र जगात सर्वत्र लागू होतो. ६ सप्टेंबर रोजी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाअंतर्गत १३८ विविध पदांच्या भरतीसाठी नऊ बाह्य सेवापुरवठादार संस्थांच्या कंत्राटदारांना मान्यता देण्याचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला. त्यामुळे राज्यातील वातावरण तापले आहे. अशातच राज्यातील सरकारी शाळांचा पायाभूत विकास व्हावा यासाठी या शाळा सुरुवातीला दहा वर्षांसाठी कार्पोरेट उद्योग समूह, स्वयंसेवी संस्था आदींना दत्तक दिल्या जातील. या माध्यमातून शाळांच्या विकासासाठी त्यांच्याकडील सीएसआर निधीचा वापर करता येईल, तसेच या समूहांना आपल्या आवडीच्या नावाप्रमाणे शाळांच्या नावापुढे आपले नावेही देता येईल, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केली होती. त्यावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

**आज संपूर्ण जगात कधी नव्हे ते वेगवान भूराजकीय, आर्थिक, सामाजिक बदल होत आहेत. 'मी माझं' ह्या कोषातून बाहेर निघालो की, आपल्याला जाणवेल ही उलथापालथ व त्याचे परिणाम अगदी आपल्या दारात हात पसरून निर्विकारपणे उभे आहेत. आपल्या महाराष्ट्र राज्यात सुद्धा प्रचंड राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा देशाच्या भविष्यावर दूरगामी परिणाम घडविणाऱ्या घटना घडत आहेत. ह्या घटनांतून निघणारे फलित आज जरी अदृश्य असले तरी भविष्यात संपूर्ण भारतात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तींवर त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम होणार आहे.**

हे सर्व एका रात्रीत घडले का? तर नक्कीच नाही. सरकार कोणतेही असो त्यांची ध्येय धोरणे किंचित फरकाने सारखीच असतात. सामान्य जनता मात्र आमचे एक मत सरकार बदलवू शकते या भ्रमात जगत असते. शिक्षण व्यवस्थेवर पहिला आघात आणि खाजगीकरणाची सुरुवात झाली ती मुळात सन २००० च्या शिक्षण सेवक योजनेने. प्रायोगिक तत्वावर, पथदर्शी प्रकल्प, राज्याच्या तिजोरीवर भार, तत्वतः असे गोंडस शब्द वापरून ही योजना सुरू केल्या गेली. तेव्हा ह्या योजनेला तीव्र असा विरोध नाही झाला. तद्नंतर हळूच केंद्राच्या धर्तीवर २००५ नंतर नियुक्त शासकीय कर्मचाऱ्यांची हक्काची पेन्शन बंद करण्यात आली. तेव्हाही हवा तसा विरोध झाला असे आठवत नाही. ह्या योजना समाज आणि कर्मचारी वर्गाच्या मताची चाचपणी करण्यासाठी सुरू केल्या जातात आणि कालांतराने हळूच त्यावर शिक्कामोर्तब केले जाते... एखाद्या गोष्टीला आपण विरोध केला नाही तर त्या गोष्टीसाठी आपली मुकसंमती आहे असे मानले जाते. शासनाचा धोरणात्मक आर्थिक निर्णय म्हणून आपली न्यायालयेसुद्धा अशा प्रकरणात हस्तक्षेप केल्याचे आठवत नाही.




शिक्षणासारख्या मूलभूत घटनात्मक गरजेचे खाजगीकरण करण्याची सुरुवात शासनाने खूप आधीच केली होती आता जे आपण बघत आहोत ते शेवटचे पाऊल आहे. त्यामुळे आता आकांडतांडव करून हाती काय लागेल हा चिंतनाचा विषय आहे. खाजगी कंपन्यांकडून राज्यातील ६५ हजार शाळांच्या भौतिक सुविधांचा विकास करण्याचा शासनाचा मानस आहे. खाजगी कंपन्या इतर बाबी सोडून शिक्षण क्षेत्रात कोणताही नफा न कमावता गुंतवणूक का करतील? हा अतिशय महत्वाचा प्रश्न येथे उपस्थित राहतो. दत्तक शाळा योजना सुरू करून सर्व शासकिय शाळा खाजगी कंपन्यांना दान देण्याचा अनाकलनीय अभिनव उपक्रम सरकार रेटून राबवत आहे. याबद्दल सर्व स्तरातून निषेध व्यक्त होताना दिसत नाही आहे. काही सन्माननीय शिक्षक संघटना याला तीव्र विरोध करत आहेत. पण इतर विभागाच्या संघटनांची भूमिका अजूनही स्पष्ट नाही. त्यात आज राजपत्रीत अधिकारी महासंघाने सरकार आंदोलनाचा इशारा दिल्याची बातमी वाचनात आली. मुळात महासंघाला सरकारच्या या निर्णयाची साधी पूर्वकल्पना नसावी याचे आश्चर्य वाटते.

कंत्राटी कर्मचारी भरतीत अजून एक मेख अशी की कर्मचारी कंत्राटदाराचे असतील आणि काम सरकारचे करतील. यात पारदर्शकता आणि विश्वासार्हता किती असेल हे ज्याचे त्यालाच ठाऊक. शासकीय शाळांच्या बाबतीत विचार करायचा झाल्यास एकदा खाजगी कंपनीने भौतिक सुविधेच्या नावाखाली अधिग्रहित केल्या की, ग्रामीण भागातील शैक्षणिक कणाच मोडून जाईल. तसेही सरकार ते मग कुणाचेही असो त्यांना शिक्षण क्षेत्रापासून स्वतःची सुटका करून घ्यायची आहे. हळूच सरकार आपले हात वर करून संपूर्ण शाळाच त्यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास देतील. मग सुरू होईल कंपन्यांची मनमानी फी वसुली. ज्यावर कुणाचेही नियंत्रण राहणार नाही. उठसुठ गुरुजींना जाब विचारणारा आणि धारेवर धरणारा पालक निमूटपणे ही सरंजामशाही स्वीकारेल यात मात्र तिळमात्र शंका नाही. तेव्हाच जनतेलाही शिक्षणाचा खरा अर्थ कळेल अशी आशा बाळगायला हरकत नसावी.

गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रात सर्वात जास्त जर नुकसान झाले असेल तर ते शैक्षणिक क्षेत्राचे. सर्व शिक्षक व त्यावर सनियंत्रण ठेवणारे केंद्र प्रमुख ते वरिष्ठ अधिकारी यांचे मानसिक खच्चीकरण करण्याचा यशस्वी सपाटा चालविल्या गेला. पाठयपुस्तक व स्थानिक गरजा लक्षात न घेता आखले गेलेले उपक्रम, त्यात धरसोड, फोटो, link, अहवाल, चाचण्यांचा भडीमार, अशैक्षणिक कामे ही यादी फार लांब आहे. हे सर्व करून झालं की मग आठवण येते ती गुणवत्तेची. शेवटी कारवाई. मागे एक अधिकारी होऊन गेलेत त्यांनी तर उपक्रमाचा धडाका लावला होता. १००% डिजिटल शाळा, तंत्रस्नेही शिक्षक, शाळाभेटी, दौरे, मेळावे सर्वत्र धामधूम माजली होती. घाईघाईत संपूर्ण शाळा १००% डिजिटल झाल्याची घोषणा झाली. आता प्रश्न परत तोच की, चार वर्षांपूर्वी डिजिटल शाळा झाल्या होत्या सगळं झालं होतं तर मग आता दत्तक शाळा प्रयोजन कुणासाठी आणि का? म्हणजे नेमकं तेव्हा कुणी कुणाला फसवलं? कुणाला इतकी घाई झाली होती? तो उपक्रम जर यशस्वी झाला होता तर त्या अधिकाऱ्याला बढती द्यायला हवी होती. किंबहुना इकडून तर आकड्यांची हेराफेरी झाली तर नसेल.

आज आपण कितीही विरोध करत असलो तरी झालेला निर्णय परत घेतला जाईल असे वाटत नाही. सामान्य जनतेकडून ह्या सर्व जुलुमी निर्णयांना विरोध होणे क्रमप्राप्त असताना तसे होताना दिसत नाही आहे. शासनाने योजनाबद्ध रितीने सामान्य जनतेत आपल्याविषयी व सर्व शासकिय कर्मचाऱ्यांविषयी नकारात्मक भावना तयार केली आहे. कुणाला वावगे वाटू नये याला आपणही तितकेच जबाबदार आहोत हे कितीही नाही म्हटले तरी मान्य करावेच लागेल. ह्या गोष्टीवर जोपर्यंत चिंतन होत नाही तोपर्यंत सरकारला दोष देत बसण्यापालिकडे आपल्या हाती काहीही उरणार नाही. कारण चलनी नाणे दोन्ही बाजूने सुस्थितीत असेल तरच समाज त्याला स्वीकारतो. मलातरी वरील चित्रात??? याऐवजी खाजगी कॉर्पोरेट शाळाच दिसत आहे...म्हणून चिंतन आवश्यक आहे...

**- गणेश कुंबडे.**

## टुडेज् ब्लॉग

# 'लोकाधिकार'चा चेहरा

गजानन कीर्तिकर नाव उच्चारले की, शिवसेनेची स्थानीय लोकाधिकार समिती डोळ्यांपुढे येते. शिवसेना आणि लोकाधिकार परिवारात गजानन कीर्तिकर हे गजाभाऊ म्हणून ओळखले जातात. त्यांनी लिहिलेल्या शिवसेना, लोकाधिकार आणि मी' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ नुकताच केंद्रीय सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत साजरा झाला. शिवसेना पक्षातील ५७ वर्षांचा राजकीय प्रवास आणि लोकाधिकार चळवळींचा लढ्याचा घटनाक्रम अतिशय रोचक आणि ओघवत्या शैलीत त्यांनी या पुस्तकात मांडला आहे.

सुधीर जोशी, गजानन कीर्तिकर, सूर्यकांत महाडिक, अनिल देसाई, विठ्ठल चव्हाण, लहू भोसले, राम भंकाळ, प्रदीप मयेकर, अरुण बेतकेकर, शरद पवार अशी किती तरी नावे सांगता येतील की, लोकाधिकार समितीसाठी त्यांनी पूर्ण वाहून घेतले. शिवसेना स्थापन झाल्यावर नागरी समस्या सोडविण्यासाठी मुंबई, ठाणे, कोकणात शाखांचे जसे जाळे निर्माण झाले तसेच सरकारी, निमसरकारी कार्यालयांमध्ये भूमिपुत्रांना नोकऱ्या व न्याय मिळवून देण्यासाठी स्थानीय लोकाधिकार समितीची स्थापना झाली. सुरुवातीला रिझर्व्ह बँक, स्टेट बँक, न्यू इंडिया इन्शुरन्स आदी ठिकाणी लोकाधिकार समितीची स्थापना झाली. नंतर केवळ राष्ट्रीय बँका व विमा कंपन्यांपुरती ही चळवळ मर्यादित न राहता विमान कंपन्या, परदेशी बँकांपर्यंत फोफावली गेली. दि. १३ डिसेंबर १९७४ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुधीर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाची स्थापना केली. स्थापना दिनी आपल्या भाषणात शिवसेनाप्रमुख म्हणाले, महाराष्ट्रात यापुढे मराठी माणसाला ८० टक्के नोकऱ्या मिळाल्या नाहीत, तर आमच्या हक्कांच्या आड येणाऱ्यांच्या कानामागे आवाज काढायलाही मराठी तरुण मागे-पुढे पाहणार नाही. गजाभाऊंच्या कामाचा उरक पाहूनच शिवसेनाप्रमुखांनी त्यांच्यावर महासंघाचे सरचिटणीसपद सोपवले.

रिझर्व्ह बँक, स्टेट बँक, राष्ट्रीयीकृत बँका, विमा कंपन्या, तेल कंपन्या, भारतीय रेल्वे, टेलिफोन कंपन्या, टपाल, भविष्य निर्वाह निधी, आरसीएफ, मुंबई पोर्ट ट्रस्ट, टीआयएफआर, नेव्हल डॉक, जहाज कंपन्या, आयआयटी, भाभा अणुसंशोधन केंद्र, सरकारी व निमसरकारी आस्थापनात लोकाधिकार समित्या स्थापन झाल्या व आजही जोमाने कार्यरत आहेत. पांढरपेशा व नोकरदार वर्गाचे नेतृत्व लोकाधिकार करीत आहे, तर कारखाने व उद्योग क्षेत्रात कामगार सेना आहे. केवळ ८० टक्के मराठी भरती एवढ्यापुरतेच न थांबता मराठी माणसाच्या इतर मागण्यांवरही लोकाधिकार समिती आग्रही राहिली. नोकर भरतीच्या जाहिराती व निविदा मराठी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्या पाहिजेत, मुलाखत घेणाऱ्यांमध्ये मराठी माणूस असला पाहिजे, प्रशासकीय व कामगार कल्याण अधिकारी मराठीच असले पाहिजेत, कंपनीने आऊटसोर्सिंगची कामे मराठी ठेकेदारांना दिली पाहिजेत, तृतीय व चतुर्थ श्रेणीतील नोकर भरतीसाठी केवळ महाराष्ट्रातील वृत्तपत्रात जाहिरात दिली पाहिजे, राखीव जागांवर मूळ महाराष्ट्राचा रहिवासी असलेल्या उमेदवारालाच नोकरी मिळाली पाहिजे.

लोकाधिकार समितीने नोकर भरतीसाठी मराठी तरुणांकरिता प्रशिक्षण वर्ग सुरू केले व आजही ते चालू आहेत. कोणत्याही राजकीय पक्षाने नोकर भरतीसाठी प्रशिक्षण वर्ग चालू ठेवावेत व त्यांचा नोकऱ्यात टक्का वाढवावा, हे देशातील एकमेव उदाहरण असावे. स्थानीय लोकाधिकार समितीच्या धगधगत्या चळवळीत स्थापनेपासून सर्व आंदोलनात नेतृत्व करण्याची संधी गजानन




कीर्तिकर यांना मिळाली. लक्षात ठेवा पुरते पक्के, मराठी माणूस १०० टक्के. शुक्ला, वर्मा, नारायणराव, मुंबई छोडके चले जाव, अशी एकेकाळी लोकाधिकार समितीची घोषणा होती. अशा घोषणांनी परप्रांतीयांच्या छातीत धडकी भरत असे. भविष्य निर्वाह निधीमध्ये महेशकुमार भाडा नावाचे आयुक्त होते. मराठी कर्मचाऱ्यांविषयी त्यांना आकस होता. त्यांना शिव्या देणे, त्यांची बदली करणे, अपमानास्पद वागणूक देणे असे त्यांचे वागणे होते. आयुक्तपदाचा गैरवापर करून ते मराठी कर्मचाऱ्यांना धमकावत असत. गजाभाऊ कीर्तिकरांच्या नेतृत्वाखाली लोकाधिकार समितीने त्यांच्या केबिनला धडक दिली. त्यांची अरेरावी बघून समितीच्या कार्यकर्त्यांचा संयम सुटला. स्वत: गजाभाऊ त्यांच्या अंगावर धावून गेले. त्यांच्या कमरेला असलेल्या पिस्तूलला हात घालण्यापूर्वीच गजाभाऊंनी ते खेचून घेतले. त्यांच्या मुसक्या आवळल्या, मग ते गयावया करू लागले. त्यांची मराठी द्वेषाची गुर्मी उतरवली. कीर्तिकरांनी शिवसेना स्टाइलने त्यांना धडा शिकवुला.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

## जन्म हा अखेरचा

# शुश्रूषुस्थल - २




गुरुजवळ गेल्यानंतर शिष्याच्या बुद्धीचा कसा विकास होतो, हे दोन उदाहरणे देऊन सांगितले आहे. सूर्याच्या किरणांच्या स्पर्शाने कमळ उमलते आणि सूर्यप्रकाशात सूर्यकांत मण्यातून अग्नी प्रकट होतो. सूर्यकांत आणि चंद्रकांत मणी हे प्रत्यक्षात कुणी पाहिलेले नाहीत. प्राचीन साहित्यात त्यांची वर्णने आलेली आहेत. चंद्रकांतमणी चंद्रप्रकाश पडल्यावर वितळतो तर सूर्यकांत मण्यावर सूर्यप्रकाश पडल्यावर त्यातून अग्नी प्रकट होतो. एखादे जाड काचेचे भिंग घेऊन जर तुम्ही सूर्यप्रकाशात धरले तर काचेतून पलीकडे गेलेला सूर्यप्रकाश एका विशिष्ट ठिकाणी केंद्रीत होतो. काचेतून गेलेली सूर्यकिरणे त्या ठिकाणी एकवटतात. त्या केंद्रस्थानी जर एखादे वस्त्र अथवा कापूस ठेवला तर तो पेटतो. असेच काहीसे सूर्यकांत मण्याचे रुप असावे. रात्रीच्या अंधारात मात्र तो मणी तळपत नाही. कमल विकसित होण्यासाठी आणि सूर्यकांत मणी प्रकाशित होण्यासाठी सूर्याची गरज असते. त्याप्रमाणे शिष्याची बुद्धी प्रकाशित होण्यासाठी गुरुपदेशाची आवश्यकता असते.

कमळाचे उदाहरण विकसित होण्याचे आहे तर सूर्यकांत मण्याचे प्रकाशित होण्याचे आहे. बुद्धी विकसित व्हावी आणि ती ज्ञानाने प्रकाशित व्हावी. प्रपंचाने आपल्या बुद्धीचा विकास होत नाही आणि त्याने बुद्धी प्रकाशितही होत नाही. प्रपंचातील सर्व सुखसाधने मिळाली तरी मनुष्याला पूर्ण सुख लाभत नाही. म्हणून प्रपंचाने मन विकसित होत नाही. ज्यामुळे मन विकसित आणि प्रकाशित होते असा केवळ परमात्माच होय. गुरुंच्या उपदेशाने बुद्धी विकसित आणि प्रकाशित होते. मग त्याला संसाराचे अनित्यत्व आणि आत्म्याचे नित्यत्व जाणवते. प्रपंच जड आहे तर परमात्मा चेतन आहे. जडाचे चिंतन केले तर बुद्धी जड होतो आणि परमात्म्याचे चिंतन केले तर ती चैतन्यमय होते. चैतन्याचा थोडा अनुभव आला तरी मन प्रसन्न होते. गाढ निद्रेत जागृती व स्वप्न नसते. त्यावेळी मनुष्य आत्म्याच्या जवळ जात असतो. तेथे प्राप्त होणारा आनंद माणसाला उल्हासित, प्रफुल्लित करतो. गुरुपदेशाने शिष्याचे हृदय प्रकाशित होत असते. शिष्याने हात जोडून गुरुसमीप जावे आणि अद्वैताचा परमानंद कसा मिळेल, असा त्यांना प्रश्न करावा, त्यावर त्यांनी सांगितलेला उपाय ऐकावा. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# आयुर्वेदाचार्य वैद्य लवंगे यांचे कार्य मोलाचे

'मरावे परि कीर्तीरुपे उरावे' असे समर्थांचे वचन आहे. जन्माला यावे, जगावे, भोगावे आणि मरावे हे सर्वांच्याच गाठी असते. परंतु यापैकी एकादाच कीर्तिवान होतो, त्याचे स्मरण लोकमानसाला स्फूर्ती देऊ राहते. जो लोकांसाठी काही करतो, तोच मोठा असतो. स्वत:चा प्रपंच व्हावा, स्वत:साठी झिजणे सर्वच करतात, लोकहितासाठी जो चंदनासम झिजतो, त्याचेच नाव शिल्लक उरते. याचा विचार यासाठी केला की, असे लोकहितकारी नरखेडचे निष्णात आयुर्वेदाचार्य वै. कै. गणपतराव व महादेवअप्पा लवंगे यांची १०९ वी जयंती नरखेड गावी प्रतिवर्षी त्यांचे अधिकारी चिरंजीव डॉ. वसंतराव लवंगे हे साजरी करतात. पितृऋण थोर असते.



'मातृपितृ भव' असा भूमीमातेचा सांगावा आहे. ते निष्णात वैद्य होते. ते पंढरीचे वारकरी होते. जुन्या पिढीतले प्रवचनकार होते, त्यापैकी ते एक होते, त्यांचे वैद्यकीय ज्ञान असामान्य होते. कोणताही असाध्य रोग ते बरा करत. नाडीवरुन ते निष्णात रोगाचे अचूक निदान करीत. संत वाङ्मयाचा त्यांचा चांगला अभ्यास होता. आपल्या व्यवसायात लौकिक तर मिळविलाच परंतु संत विचार प्रसूत करण्याची त्यांची तळमळ वाखाणण्यासारखी होती. अनेक ठिकाणी त्यांनी कीर्तने, प्रवचने केलीत. रुग्णांची सेवा हा त्यांचा धर्मच होता. त्यांचे पूर्ण घराणे सुशिक्षित आणि सुसंस्कृत आहे. त्यांनी लावलेल्या वटवृक्षांच्या सावलीत त्यांची मुले, मुली आणि नातवंडे, परतुंडे खेळतात. त्यांचे दोन नातू सुध्दा आयुर्वेदाचार्य झाले आहेत. त्यांचा जन्म गणेश चतुर्थी दिवशीच झाला होता. एक निर्मळ मनाचा, निश्चल वृत्तीचा, निरागस वारकरी म्हणून त्यांचा लोकिक होता. त्यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी नेत्रशिबीर आयोजित केले जाते. आजपावेतो ३०० ते ३५० लोकांना लेन्स बसविण्यात आले आहेत. त्यांच्या १०९ व्या जयंती निमित्त धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. **- शीतल पाटील, ता. मंगळवेढा.**

# पालकांच्या संमतीने विवाह करणे योग्य

वृत्तपत्रात मुली, महिला बेपत्ता झाल्याच्या बातम्या येतात. काहीजणी सापडत असतील पण बेपत्ता झालेल्यांचे काय झाले असेल? अधिक सावधगिरी आवश्यक आहे. तसेच यंत्रणानी यासंदर्भात कठोर भूमिका घेणे महत्वाचे वाटते. प्रेमाच्या जाळ्यात अडकून अनेकींची फसवणूक झाली असून पालकांच्या संमतीने विवाह करणे योग्य असेल. **- प्र. मु. काळे, नाशिक.**

# मोडलेला कणा अन् विकलेला खांदा!

'आधीच मर्कट त्यात मद्य प्याला' अशी स्थिती सध्या पाकिस्तानची आहे. पाकिस्तानला आधार आहे तो चीनचाच. चीनने पाकिस्तानमध्ये काही प्रमाणात गुंतवणूक केली आहे. त्याशिवाय पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांची पाठराखणही केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तानची वारंवार उचललेली तळी याकडेच अंगुलीनिर्देश करते. त्यामुळे सध्या तरी, आर्थिक कणा मोडलेल्या पाकिस्तानने भारताविरोधात कारवाया करण्यासाठी आपला खांदादेखील विकला असल्याचे दिसते.

काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्याच्या गडोले जंगल परिसरात अतिरेकी लपून बसले असल्याची खबर मिळाल्यानंतर भारतीय लष्कर आणि पोलिसांनी मंगळवार, १२ सप्टेंबर रोजी संयुक्त ऑपरेशन हाती घेतले. अतिरेक्यांबरोबर चकमक सुरू असतानाच दुसऱ्या दिवशी भारताचे ४ सुपुत्र शहीद झाले. १९ राष्ट्रीय कर्नल मनप्रीत सिंग, मेजर आशीष धौंचक आणि जम्मू-काश्मीर पोलीस दलाचे डीएसपी हुमायूं भट तसेच एक जवानाला वीरमरण आले. प्रतिबंधित दी रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) या संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.

साधारणपणे ४ वर्षांपूर्वी अनुच्छेद ३७० आणि ३५ए रद्द केल्यापासून जम्मू आणि काश्मीरमधील पाकपुरस्कृत दहशतवादी कारवायांचे प्रयत्न सातत्याने होत आहेत, मात्र सुरक्षा दलांच्या दक्षतेमुळे जम्मू आणि काश्मीरमधील अतिरेकी कारवायांमध्ये मोठी घट नोंदवली गेली आहे. २०१८ मध्ये ४१७ अतिरेकी हल्ल्याच्या घटना नोंदवल्या गेल्या होत्या, तर २०१९मध्ये जम्मू-काश्मीरचा स्वतंत्र राज्याचा दर्जा काढून घेतल्यानंतर २०१९ मध्ये २१५ अतिरेकी हल्ले झाले. या सर्वांमागे पाकिस्तान आहे, हे उघड गुपित आहे. आपल्या भूमींवर दहशतवाद्यांना आश्रय द्यायचा, त्यांना प्रशिक्षण देऊन शस्त्रसज्ज करायचे आणि जम्मू-काश्मीरमध्ये अशांतता निर्माण करण्यासाठी भारतात घुसवायचे, हेच पाकिस्तानी दहशतवादी संघटना फार पूर्वीपासून करत आल्या आहेत.

आता १२ सप्टेंबरच्या अतिरेकी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या टीआरएफचा उदयदेखील जम्मू-काश्मीरमधील अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर झाला. काश्मीरमधील नव्या स्वदेशी प्रतिकाराची



सुरुवात म्हणून टीआरएफ अस्तित्वात आल्याचे चित्र रंगवण्यात आले आहे. म्हणजेच ही स्वदेशी चळवळ असल्याचे भासवले जात असले तरी, या संघटनेच्या क्रियांमागे लष्कर-ए-तैयबा (एलईटी) असल्याचे दिसत आहे. टीआरएफ ही पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबाचा छुपा तंझीम (इस्लामिक दहशतवादी गट) आहे आणि काश्मीरमधील दहशतवादी गट स्थानिक संघटनांसारखे वाटावेत, यासाठी पाकिस्तानने तो तयार केला आहे. पाकिस्तानकडून त्यांना अर्थसहाय्य केले जाते. स्थापनेपासूनच TRF ने प्रामुख्याने काश्मिरी पंडित आणि शीखांना लक्ष्य केले आहे. त्यांना काश्मीर सोडण्यास भाग पाडण्यासाठी भविष्यात अल्पसंख्याकांवर असे आणखी हल्ले करू, असा इशाराही या संघटनेने यापूर्वीच दिला आहे. माजी लष्करप्रमुख जनरल नरवणे यांनी टीआरएफचा उल्लेख टेरर रिव्हायव्हल फ्रंट' असे केले आहे. पाकपुरस्कृत ही एकमेव स्थानिक संघटना नाही. युनायटेड लिबरेशन फ्रंट जम्मू ॲण्ड काश्मीर' अशाही संघटना कार्यरत आहेत.

सध्या पाकिस्तानची आर्थिक स्थिती खूपच दयनीय आहे. आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर हा देश उभा आहे, पण तरीही काश्मीरमध्ये अशांतता निर्माण करण्यासाठी पाकिस्तान कायम प्रयत्नशील असतो, म्हणूनच सातत्याने भारतात घुसखोरीचे प्रयत्न सुरूच आहेत. अतिरेक्यांबरोबरच अधिकाधिक शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा भारतीय हद्दीत पाठविण्याचे धोरणही पाकिस्तानी लष्कर अवलंबत असल्याचे पहायला मिळत आहे. त्यामुळेच घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अतिरेक्यांकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे सापडली आहे. त्यातही ही अत्याधुनिक शस्त्रे कोणती? याचाही उलगडा झाला आहे. नियंत्रण रेषेजवळ उत्तर काश्मीरच्या बांदिपोर जिल्ह्यातील गुरेझ सेक्टरमध्ये ५ सप्टेंबर २०२० रोजी पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधून घुसखोरींचा प्रयत्न करणाऱ्या दहशतवाद्यांच्या गटाला भारतीय जवानांनी रोखले. तेव्हा त्यांनी आपली पाठीवरची बॅग टाकून माघारी पाकिस्तानात पळ काढला. यात २ दहशतवादी ठार झाले. हस्तगत केल्या आहेत. पाकिस्तानला आधार आहे तो, चीनचाच. चीनने पाकिस्तानमध्ये काही प्रमाणात गुंतवणूक केली आहे. त्याशिवाय, पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांची पाठराखणही केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तानची वारंवार उचललेली तळी याकडेच अंगुलीनिर्देश करते. त्यामुळे सध्या तरी, आर्थिक कणा मोडलेल्या पाकिस्तानने भारताविरोधात कारवाया करण्यासाठी आपला खांदादेखील विकला असल्याचे दिसते.

**- मनोज जोशी.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## शिक्षण विभागाला कोणी अधिकारी देता का हो?

# जि.प.च्या शिक्षण विभागाला लागलेली साडेसाती केव्हा संपणार?

सुराज्य/सोलापूर

**जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला मागील तीन-चार वर्षांपासून खणक्या शिक्षणाधिकारी मिळत नसल्याने प्राथमिक शिक्षण विभागाबरोबर माध्यमिक शिक्षण विभागाची ही इज्जत गल्लीपासून थेट मंत्रालयापर्यंत गेली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात खामक्या शिक्षणाधिकाऱ्याची गरज असून कोणी शिक्षणाधिकारी देता का हो शिक्षणाधिकारी ?अशी म्हणण्याची वेळ गरजू आणि वंचित शिक्षकांवर आली आहे.**



जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग म्हणजे ज्ञानाचा झरा आणि याच ज्ञानदानामध्ये पवित्र शिक्षण देणाऱ्या शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांचेही अवहेलना जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये दिसून आली आहे. काही शाळेत प्रमाणापेक्षा जास्त विद्यार्थी आहेत. त्या ठिकाणी शिक्षकांची संख्या कमी आहेफ ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे .त्या ठिकाणी शिक्षक कमी आहेत .त्यामुळे ज्या शाळेमध्ये शिक्षकांची कमी आहे अशा शाळेतील विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय होत आहे .या सर्व बाबी शिक्षण विभागाला माहिती असून सुद्धा गेल्या तीन-चार वर्षांपासून बदली आणि प्रतिनियुतीच्या नावाचा खेळ खंडोबा शिक्षण विभागामध्ये मध्ये सुरू आहे .ज्या शिक्षकांचा अधिकाऱ्यांकडे वशिला आहे असे शिक्षक तसेच अधिकाऱ्यांच्या मर्जीतले शिक्षक आणि पुढाऱ्यांच्या जवळ चाचूगिरी करणारे शिक्षक अशा शिक्षकांची नियुक्ती शहरालगत करण्यात येते. त्यामुळे मर्जीतले शिक्षक संघटनेवर काम करणारे शिक्षक पुढाऱ्यांचे लागे बंद असलेले शिक्षक या शिक्षकांना मुख्यालयात न ठेवता जिल्ह्याच्या इतर कानाकोपऱ्यामध्ये का त्यांची बदली केली जात नाही ?असा सवाल अन्यायग्रस्त असलेल्या शिक्षकांमधून होत आहे

एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला एक न्याय अशी जी पद्धत जिल्हा परिषदेमध्ये सुरू आहे . या पद्धतीला कुठेतरी आवर घातला पाहिजे. संबंधित जिल्हा प्रशासनाकडे याबाबत वारंवार तक्रारी करून सुद्धा जिल्हा परिषद प्रशासन यावर कुठलीही कारवाई करत नाही उलट आयुक्तांच्या प्रति नियुक्ती वरती हे लोक मुख्यालयात काम करतात असे सांगितले जाते .

परंतु प्रस्ताव हे जिल्हा प्रशासनाकडूनच जातात ना असा प्रति सवाल शिक्षकांमधून होत आहे. आयुक्तांकडून होत असणारी प्रति नियुक्ती या प्रति नियुक्तीला जिल्हा प्रशासनाने तशा पद्धतीच्या आयुक्तांकडे अहवाल पाठवायला पाहिजे तरच पुढील कार्यवाही थांबवता. येईल. परंतु इथे तसे झाले नसल्याने शिक्षण विभागाची नाचक्की होत आहे

प्रशासनाला जर शिक्षकांची खरीच बाजू मांडायची असेल तर त्यांनी आयुक्तांकडे याबाबतचा पाठपुरावा करणे गरजेचे असल्याचे मत अनेक शिक्षक संघटनांमधून व्यक्त होत आहे. आज पर्यंत शिक्षण विभागामध्ये माध्यमिक चा असोत किंवा प्राथमिकचार असो एकही शिक्षणाधिकारी परिपूर्ण आतापर्यंत मिळाला नसल्याची खंत अनेक शिक्षण वर्गातून होत आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी नसल्याने गेल्या अनेक महिन्यापासून महत्त्वाच्या फायली अडकून पडल्या आहेत .काहींचे मेडिकल बिले आहेत काही शिक्षकांची पेन्शन सारखे महत्त्वाचे बिले अडकले आहेत. काही शिक्षकांच्या पगारी अनेक वर्षापासून अडकलेले आहेत. तर काही शिक्षकांच्या वाढवून मिळालेल्या टप्प्यातील पगारी आहेत .अशा अनेक प्रकारच्या शेकडो फाईल माध्यमिक शिक्षणात पडून आहेत. तीच अवस्था प्राथमिक शिक्षण विभागातही आहे.

### पूर्ण वेळ काम करणाऱ्या अधिकाऱ्याची गरज

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात जोपर्यंत माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण विभागाला खामक्या शिक्षणाधिकारी मिळत नाही तोपर्यंत कामांमध्ये होत असलेली दिरंगाई दूर होणार नाही .त्यामुळे प्रशासनाने खमक्या अधिकाऱ्याची प्रशासनाकडून मागणी करावी व पूर्ण वेळ काम करणारा शिक्षणाधिकारी शिक्षण विभागाला देण्यात यावा अशी ही मागणी सर्व शिक्षकांतून होत आहे

### अनेक दिवसापासून कामे पेंडिंग

माध्यमिकचे तत्कालीन शिक्षणाधिकारी राजेंद्र बाबर यांची बदली झाल्यापासून आतापर्यंत तीन ते चार जणांकडे तेथील चार्ज देण्यात आला होता परंतु आठ दिवस, महिना ,दीड महिना ,अशा कार्यकालात तेथील चार्ज संबंधित शिक्षणाधिकाऱ्याकडून काढून घेतला माध्यमिक शिक्षण विभागामध्ये पूर्णवेळ शिक्षणाधिकारी मिळत नसल्याने आणि प्राथमिक शिक्षण विभागाला पूर्ण वेळ शिक्षणाधिकारी मिळत नसल्याने दोन्ही शिक्षण विभागातील कामे गेल्या अनेक दिवसापासून पेंडिंग आहेत.



## पद्मशाली सखी संघमच्या 'लोगो' आणि 'ब्रीदवाक्याचे' अनावरण

**सोलापूर** : श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनचे लोगो आणि ब्रीदवाक्य 'नवनवीन कल्पनांच्या विचारांना उभारी देवूया'.! याचबरोबर पद्मशाली सखी संघमच्या 'एकटी नव्हे, आम्ही सर्व सखी'! हे ब्रीदवाक्य आणि लोगो'चे अनावरण पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष, सोलापूरचे माजी महापौर महेश कोठे यांच्या हस्ते नुकतेच थाटात करण्यात आले. याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा यांच्या संकल्पनेतून आणि रजनी दुस्सा यांच्या अथक परिश्रमांतून हा 'लोगो' तयार करण्यात आला. या सोहळ्यास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे सचिव तथा फाउंडेशनचे मार्गदर्शक गणेश पेनगोंडा, सल्लागार सुकुमार सिध्दम, श्रीराम मंदिराचे ट्रस्टी आणि फाउंडेशनचे सल्लागार दयानंद कोंडाबत्तींनी, उपाध्यक्ष श्रीनिवास कामूर्ती, किशोर व्यंकटगिरी, पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षा ममता मुदगुंडी, उपाध्यक्षा जमुना इंदापूरे, सहसचिवा ममता तलकोकूल, खजिनदार दर्शना सोमा, कार्याध्यक्षा वरलक्ष्मी गोटीपामूल, समन्वयिका अरिता इप्पलपल्ली, कला चन्नापट्टण, सुनिता निलम (क्यामा), पल्लवी संगा, संगीता रॅकम, सुरेखा भिमनपल्ली आदी उपस्थित होते. समन्वयिका कला चन्नापट्टण ह्या सूत्रसंचालन करुन आभार मानले.



## आयुक्तांच्याा घरी पर्यावरण पूरक मूर्तीची प्रतिष्ठापना

**सोलापूर** : महापालिकेचे आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या निवासस्थानी आज त्यांचे नऊ वर्षीय चिरंजीव आदित्यने बनविलेली पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी परिवारासह श्री गणेशाची आरती करण्यात आली. या माध्यमातून महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचा कृतिशील संदेश शहरवासीयांना दिला आहे. आयुक्तांचे नऊ वर्षीय चिरंजीव आदित्यने पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्ती तयार केली. त्याच पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना आयुक्तांच्या निवासस्थानी आज मनोभावे करण्यात आली. मंगलमय वातावरणात शहरातील नागरिकांनी आपल्या घरी पर्यावरण पूरक गणेश मूर्ती प्रतिष्ठापना करून घरातच विसर्जन करावे, असे आवाहन करत महापालिका आयुक्तांनी शहरातील नागरिकांना, मंडळांना श्री गणेशोत्सवाच्या यावेळी शुभेच्छा दिल्या आहेत.

## वाळूज येथे प्राणघातक हल्ला; आरोपींचा जामीन मंजूर

**सोलापूर** : मोहोळ तालुक्यातील वाळुज येथे शेतीच्या वादातून कोयत्याने डोक्यात वार करून तसेच अंगावर पेट्रोल ओतून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणील सुनिता विश्वनाथ कादे (रा.वाळुज) हिचा अटकपूर्व जामीन तसेच अटकेत असलेले रामचंद्र पोपट कादे व पोपट रतन कादे (दोघे रा.वाळुज) यांच्या जामीन अर्जास जिल्हा व सत्र न्यायाधीश रेखा पांढरे यांनी नुकतीच मंजूरी दिली . १० ऑगस्ट २०२३ रोजी दुपारच्या सुमारास फिर्यादी दिनेश कादेचे नविन घराचे बांधकाम चालु असल्याने त्याचे वडील,भाऊ असे तिघेजण होते . त्यांचा सख्खा चुलता प्रभाकर कादे आणि सोपान पाटील असे दोघे शेतात आले . त्यांनी ट्रैक्टर चालकास किटकनाशक औषधाची फवारणी करण्यास सांगितले होते. त्यावेळी सर्वांनी त्यांना विरोध केला होता त्यावेळी हा प्रकार घडला होता.या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली होती . या प्रकरणात आरोपीतफे अँड. संतोष न्हावकर, अँड. वैष्णवी न्हावकर, अँड. राहुल रूपनर,अँड. शैलेश पोटफोडे अँड मीरा पाटील अँड. जयराज नंदुरकर यांनी तर सरकार पक्षातर्फे अँड. अल्पना कुलकर्णी यांनी काम पाहिले.

## अक्कलकोट शहर व तालुक्यात जल्लोषात गणरायांचे स्वागत

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट शहर व तालुक्यामध्ये गुलांलाची मुक्त हस्ते उधळण करत पारंपारिक वादयाच्या संगतीने जल्लोषात गणरायांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. अक्कलकोट शहर तालुक्यामध्ये शांततेत ३०८ सार्वजनिक मंडळाच्या गणेशोत्सवाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये ३५ गावांत एक गांव एक गणपती हा उपक्रम राबविण्यात आला.

यामध्ये उत्तर पोलीस स्टेशन अंतर्गत अक्कलकोट शहरात ६७, ग्रामीण भागात ८८ व एक गांव एक गणपती १७ असे एकुण



उत्तर पोलिस स्टेशन अंतर्गत एकुण १५५ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने गणेश मुर्तीची स्थापना केली.

दक्षिण पोलीस स्टेशन अंगर्तत १५३ सार्वजिनक गणेश मंडळांनी नोंदणी केली असुन १८ गावात एक गांव एक गणपती बसविण्यात आले. तरा ७००० घरगुती मंडळाने स्थापना केली. अक्कलकोट शहरामध्ये माळी गल्ली,राम गल्ली,भारत गल्ली, बुधवार पेठ, खासबाग, कांदाबाजार, एव-वन चौक, शिवाजीनगर आदीसह शहरात उत्साहात गणरायाची स्थापना करण्यात आली.

मुख्य बाजार पेठेतील रस्ता दिवसभर वाहतुकीसाठ बंद केला होता.पोलीसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करत चोख बंदोबस्त ठेवला होता.

### असा आहे बंदोबस्त

उत्तर पोलीस अंतर्गत ८ पोलीस अधिकारी, ५५ पोलीस अंमलदार, एस आर पी एफ चे २६ जवानाची एक तुकडी, ५५ होमगार्ड तर दक्षिण पोलीस स्टेशन अंतर्गत पोनि १, सपोनि पोसई ४, अंमलदार ३८, होमगार्ड ५५ व नवीन रिक्रुट २० असे वाढीव बंदोबस्त आहे.

## डोक्यात लोखंडी पट्टीने मारहाण

**सोलापूर** : लक्ष्मी मार्केट सिद्धेश्वर पेठ सोलापूर येथे हसन अल्लाउद्दीन शेख (वय-४६,रा.लक्ष्मी मार्केट,सिद्धेश्वर पेठ,सोलापूर) यांना दुकानासमोर भंगार विक्री करिता आलेल्या ग्राहकाच्या कारणावरून युसुफ चाँदसाहब शेख व आयान युसुफ शेख यांनी लोखंडी पट्टीने डोक्यात मारून गंभीर जखमी केले आहे.

ही घटना १६ सप्टेंबर रोजी दुपारी साडेचार ते सात वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी हसन शेख यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून युसुफ शेख व आयान शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## बीबीदारफळ येथे चाकू आणि लोखंडी गजाने मारहाण

**सोलापूर** : पूर्वीच्या भांडणावरून चाकू, लोखंडी गज आणि काठीने केलेल्या मारहाणीत ७४ वर्षीय वृद्ध इसम गंभीर जखमी झाले. ही घटना बीबीदारफळ (ता. उत्तर सोलापूर) येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. शिवाजी सोपान ननवरे (वय ७४ रा. बिबीदारफळ) असे जखमींचे नाव आहे. त्यांना विठ्ठल ननवरे (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. पहाटे दीड वाजेच्या सुमारास शिवाजी ननवरे हे घराजवळ थांबले होते. त्यावेळी पूर्वीच्या भांडणावरून अरुण बारस्कर, त्याचा मुलगा अक्षय बारस्कर, अजय उर्फ विष्णू बारस्कर आणि इतर चौघांनी मिळून त्यांना मारहाण केली.

## कोळेगाव येथे रात्री अपघात; पादचारी इसम ठार

**सोलापूर** : रस्ता क्रॉस करीत असताना अनोळखी वाहनाच्या धडकेने ४० वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात कोळेगाव (ता.मोहोळ ) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडला. सिद्धेश्वर अगणु वाघमोडे (वय ४० रा. कोळेगाव) असे मयताचे नाव आहे. ते काल रात्री १० वाजेच्या सुमारास कोळेगाव येथील हॉटेल फिश येथून रस्ता ओलांडून घराकडे जात होते.

## दारू पाज म्हणून हॉटेलात मारहाण

सुराज्य/सोलापूर

हॉटेलमधे जेवण करीत असताना दारू पाज असे म्हणत काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करून दोघांना जखमी करण्यात आले. ही घटना बार्शी येथील गादेगाव रोडवर असलेल्या रंगत हॉटेलमध्ये रविवारी घडली. या प्रकरणात बार्शी शहरच्या पोलिसांनी शुभम जगन्नाथ शिंदे (रा.अमन चौक बार्शी) सोन्या मच्छिंद्र बचाटे (रा. नागोबाची वाडी ता.बार्शी) आणि अन्य दोन अनोळखी इसम अशा चौघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात जखमी झालेले सतीश अंकुश कोंडारे (वय ४८ रा . गादेगाव रोड बार्शी) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. ते रविवारी सायंकाळच्या सुमारास मित्र ज्ञानेश्वर गायकवाड यांच्यासोबत रंगत हॉटेलमध्ये जेवण करीत होते. त्यावेळी शुभम शिंदे यांच्यासह चौघे येथे येऊन, तु आम्हाला दारू पाज असे म्हणत शिवीगाळ करून मारहाण केली. तपास हवालदार पायधन करीत आहेत.

### मोरवड येथे घरात घुसून तीक्ष्ण शस्त्राने मारहाण

**सोलापूर** :घरात घुसून तीक्ष्ण शस्त्र आणि दगडाने केलेल्या मारहाणी महिलेसह दोघेजण जखमी झाले. ही घटना मोरवड (ता. करमाळा) येथे रविवारी घडली. या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. छगन बापू कुदळे (वय ४५ रा.मोरवड) या जखमींनी पोलिसात तक्रार दाखल केली. अनोळखी इसम घरात घुसला. आणि विनाकारण त्यांना शस्त्राने पायावर मारहाण केली . त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांची आई वाचविण्याचा प्रयत्न केली असता त्यांना देखील आरोपीने दगडाने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. स.पो.नि.टिळेकर तपास करीत आहेत.

### मुलीवर अत्याचार; आरोपी निर्दोष मुक्त

**सोलापूर** : अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म केल्याप्रकरणी गुन्हा शाबीत न झाल्यामुळे रवींद्र शंकर शेळके (वय वर्षे - २६ ) याला माळशिरचे जिल्हा व सत्र न्यायाधीश म. ना. पाटील यांनी निर्दोष मुक्त करण्याचा आदेश नुकताच दिला. ४ एप्रिल २०१४ रोजी पीडिता ही सकाळी शाळेतून परत येत असताना आरोपीने तिच्यावर अत्याचार केला. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी शेळके विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, निशांत लोंढे, ॲड. अमित सावळगी यांनी तर सरकारच्यावतीने ॲड. संग्राम पाटील यांनी काम पाहिले.

## अडीच वर्षांपूर्वी बालिकेचे अपहरण
## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने लावला छडा

सुराज्य/सोलापूर

अडीच वर्षांपूर्वी बालिकेचे अपहरण केलेल्या गुन्ह्याचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडून छडा लावण्यात आला आहे.

विजापूर नाका पोलीस ठाणे गुरनं.१००३/२०२० भादविसंक ३६३ प्रमाणे दि.२२ ऑक्टोंबर २०२२० रोजी गुन्हा दाखल असून या गुन्ह्यातील अल्पवयीन बालिकेस गुन्ह्यातील निष्पन्न संशयित आरोपी विशाल भीमा राठोड याने आमिष दाखवून पळून नेल्या असल्या संदर्भात गुन्हा दाखल झाला होता.या गुन्ह्यात अल्पवयीन बालिका व संशयित आरोपी यांचा गेली अडीच वर्षापासून विजापूर नाका पोलीस ठाणे तत्कालीन तपासीक अंमलदार शोध घेत होते. हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष येथे ३० मे २०२३ रोजी वर्ग करण्यात आला होता. त्यानंतर अल्पवयीन बालिका व निष्पन्न संशयित आरोपी विशाल राठोड हा लग्न करून सोलापूर येथे १८ सप्टेंबर २०२३ रोजी विजापूर रोड प्रताप नगर तांडा येथील आईच्या घरी असल्याची माहिती मिळाली. दोघांना अवघ्या तीन महिन्यात ताब्यात घेतले. ही कामगिरी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस निरीक्षक महादेव,राऊत महिला पोलीस उपनिरीक्षक निशीपुन शेख,सहाय्यक फौजदार राजेंद्र बंडगर,हेमंत मंठाळकर,पोलीस नाईक अ.सत्तार पटेल,अकिला नदाफ,प्रकाश गायकवाड,अविनाश पाटील, मच्छिंद्र राठोड यांनी केलेली आहे.

## अकलूजच्या मार्केटमध्ये डाळिंबाची विक्रमी दराने विक्री

सुराज्य/सोलापूर

अकलूज डाळींब मार्केटची ख्यातीच न्यारी...डाळिंबाचा भाव ४५० रुपयावरी... शेतकऱ्यांच्या शेती मालाला आता अकलुजच्या बाजार पेठेत विक्रमी दर मिळू लागल्यामुळे आता डाळींबाची पंढरी म्हणून अकलूजची नव्याने ओळख निर्माण झाली

येथील डाळिंब व्यापारी युसुफ रफिक बागवान यांच्या अमन फ्रुट कंपनी व मुन्नाभाई चौधरी यांचे बादशाह फ्रुट कंपनी या फर्मला अनुक्रमे गारअकोले येथील प्रगतशील शेतकरी संतोष भागवत केचे यांचे भगवा जातीचे डाळिंबास अनुक्रमे ४५० रूपये प्रति किलो दर,तर वालचंदनगर येथील प्रगतशील शेतकरी विशाल बोंद्रे यांच्या डाळींबास ४०० रूपये प्रति किलो असा उच्चांकि दर मिळालाफ



याप्रसंगी संतोष भागवत केचे,अमोल गायकवाड,वालचंदनगर येथील विशाल बोंद्रे अकलुज बाजार कमिटीचे सचिव काकडे,उराडे तोलार व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने हजर होते. येथील व्यापारी मनोज जाधव,राजू भाई बागवान,अक्षय सोनवणे, सादिक बागवान,धनाजी घाडगे,सागर नागणे,मुन्नाभाई चौधरी,जावेद भाई,युसुफ बागवान,ज्ञानदेव कोकरे,तेजस पाटील,बालाजी डुंगळे,नाथा पाटील,अमोल जाधव,सरपंच भोसले, आदी सर्वच व्यापारी शेतकऱ्यांचा येणारा चांगला माल...चांगला दर यास अनुसरून डाळींब खरेदी स्पर्धात्मक रित्या करत आहेत वाढीव दर मिळाल्याने सणासुदीच्या काळात शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ टंचाई निधीतून १०० बोअर घेण्याचा निर्णय

## आमदार राजेंद्र राऊत यांनी माहिती

सुराज्य/बार्शी

बार्शी शहरातील पाणीटंचाई निवारणार्थ टंचाई निधीतून बार्शी शहरात विविध ठिकाणी १०० बोअर घेवून त्यामध्ये पंप बसवून तसेच टाक्या बसवून नागरिकांना पाण्याची सोय उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आमदार राजेंद्र राऊत यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते.

बार्शी नगरपालिकेत आ. राजेंद्र राऊत यांनी शहरातील पाणी टंचाई संदर्भात आढावा बैठक घेतली. त्यानंतर नगरपालिकेच्या जगदाळे मामा सभागृहात याबाबतची माहिती दिली. आमदार राऊत म्हणाले, शहराला मुख्यत्वे उजनी जलाशय, चांदणी तलाव तसेच शहरातील विहीरींचे एकत्रित केलेले पाणी याद्वारे पाणीपुरवठा होत होता. परंतु पाऊस न झाल्याने चांदणी तलावात पाणीसाठा नाही. तेथून मिळणारे पाणी बंद झाले आहे. उजनी जलाशय २३ टक्के प्लस मध्ये आहे. त्यातील सुमारे ६ टीएमसी पाणी सोडले जाणार असल्याने १७ टक्केच पाणीसाठा



आहे. धरणात पाणीसाठी कमी असल्याने परिणामी मोटारींचा डिस्चार्जही कमी आहे. त्यामुळे दैनंदिन शहराला उपलब्ध होणाऱ्या पाण्यात मोठी तूट निर्माण झाली आहे. सध्या दीड कोटी लिटर्स एवढे पाणी उपलब्ध होत आहे. त्यात कुर्डूवाडी, कंदर पंपहाऊस येथील वीज पुरवठा खंडित झाल्यास पुन्हा पाणी कमी मिळते. जीर्ण झालेली पाईपलाईन फुटते. त्यामुळे पाणीपुरवठयात व्यत्यय येतो. शहरवासियांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू नये यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. नैसर्गिक अडचणींपुढे काही करता येत नाही. परंतु तरीही एवढयावर न थांबता टंचाई निधीतून प्रत्येक प्रभागात ४ ते ५ ठिकाणी बोअर घेवून शहरवासियांना पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांनीही पाणी काटकसरीने वापरून तसेच पाण्याचा अपव्यय न करता पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन केले.

### नव्या पाईपलाईनला लवकरच मंजुरी : राऊत

अमृत योजनेतून शहरासाठी नव्या पाईपलाईनचा सुमारे २९६ कोटी रूपयांचा प्रस्ताव पाठविला आहे. राज्य सरकारने त्याला मंजूरी दिली असून लवकरच या केंद्र सरकारचीही याला लवकरच मंजूरी मिळेल असा विश्वास आमदार राऊत यांनी यावेळी व्यक्त केला.



## हिंदी भाषेत मालक बनवण्याची क्षमता : डॉ अनिल साळुंखे

**नातेपुते** : सध्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये हिंदी भाषेचा अभ्यासक्रम तयार करताना कौशल्य विकासावर जास्त भर देण्यात आला आहे. त्यामुळे विविध क्षेत्रात कौशल्य संपादन करून फक्त रोजगार निर्मितिच नाही तर कौशल्या वर आधारित उद्योग व्यवसाय सुरू करून इतरांना रोजगार देणारे मालक बनवण्याची क्षमता हिंदी भाषेमध्ये आहे, असे प्रतिपादन करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. अनिल साळुंखे यांनी केले. येथील सहकार महर्षि शंकरराव मोहित पाटील महाविद्यालयात हिन्दी दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर हे उपस्थित होते. यावेळी हिंदी दिनानिमित्त घेण्यात आलेल्य निबंध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आली. यावेळी हिंदी ग्रंथ प्रदर्शन हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रास्ताविक हिन्दी विभाग प्रमुख प्रा.रज्जाक शेख यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी ऋतुजा फूले हिने केल प्रा. दत्तात्रय साळवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्रा. उत्तम सावंत, प्रा. डॉ. राजेंद्र खंदारे, प्रा. डॉ. बाळासाहेब निकम, प्रा. सस्ते, प्रा. शेख, प्रा. राजगुरु व विद्यार्थी उपस्थित होते.



## ब्रह्मदेवदादा माने महाविद्यालयाचे व्हॉलीबॉल स्पर्धेत वर्चस्व

**सोलापूर** : युवक सेवा संचालनालय, पुणे विभाग व जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा झाल्या. या स्पर्धेमध्ये उत्तर सोलापूर तालुक्यातील अनेक महाविद्यालयाने सहभाग नोंदविला होता. यामध्ये १९ वर्षे मुली या वयोगटात ब्रह्मदेवदादा माने कनिष्ठ महाविद्यालय, बेलाटी येथील विद्यार्थिनींची प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीयसाठी निवड झाली. स्पर्धेमधील खेळाडू पुढीलप्रमाणे-ज्ञानेश्वरी गोसावी, सलमा शेख, फिजा फुलारी, संध्या चव्हाण, विजया कुचेकर, विशाखा ढोले, राजलक्ष्मी येलगुंडे, ऐश्वर्या पवार, योगिता राठोड, रसिका राठोड, ऐश्वर्या पांढरे इ. खेळाडूंची निवड झाली. या खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. गोकुळ यादव यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, सचिवा जयश्री माने, विश्वस्त स्नेहल माने, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राहुल माने, प्राचार्य प्रतिभा मान आदींनी खेळाडूंचे अभिनंदन केले.




## भावसार व्हिजनतर्फे सायकल बँकेची स्थापना

**सोलापूर** : भावसार व्हिजनचे राष्ट्रीय संचालक शिवाजी उपरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भावसार व्हिजन सोलापूर क्लबच्यावतीने विद्यानिकेतन प्रशालेत १० च्या गरजू व गरीब विद्यार्थ्यांसठी सायकल बँकची स्थापना करण्यात आली.

यावेळी प्रशालेचे उपाध्यक्ष बापू ढगे, शिवाजी उपरे, व्हिजनचे अध्यक्ष मल्लिनाथ बासूतकर, सचिव प्रणिता महिंद्रकर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. प्रस्तावना गोपी नवले यांनी केली. अध्यक्ष मल्लिनाथ बासुतकर यांनी योजनेची माहिती विस्ताराने दिली. याप्रसंगी माजी गव्हर्नर गिरीश पुकाले, माजी अध्यक्ष श्री राज निकते, संतोष पुकाले, सुनील उपरे, दीपक महिंद्रकर,विशाल महिंद्रकर, विशाल खमीतकर, दत्तात्रय फुटाणे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन नितीन मुसळे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुमित औसेकर यांनी केले.



## डॉ. लोखंडे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील डॉ. चंद्रकांत लोखंडे यांनी संशोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना यंदा स्व. पी. डी पाटील प्रतिष्ठानच्यावतीने महाराष्ट्र भूषण पुरस्कार नुकताच कराड येथे आखील भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी कराडचे आमदार बाळासाहेब पाटील, डॉ. अशोकराव गुजर, रेश्मा कोरे, डॉ. श्रीपाल सबनीस आदी उपस्थित होते.



## प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी

**वेळापूर** : वेळापूर ग्रामपंचायत येथे प्रबोधनकार ठाकरे (केशव सिताराम ठाकरे) यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी दीप प्रज्वलन सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले तसेच उपसरपंच बापू मूंगूसकर यांनी पुष्पहार अर्पण करून केला. यावेळेस ग्रा. वि. अधिकारी कैलास सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य दीपक राऊत, अमृतराव माने देशमुख, भारत कोळपे, माऊली जानराव, विजय पांडगळे, कसबे सर, ग्रामपंचायत कर्मचारी बापू घोरपडे, सयाजी पवार, उमेश माने देशमुख, नागेश नाईक नवरे, पूजा लावंड आदी उपस्थित होते.

# इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूल्समध्ये गणरायाचे जल्लोषात स्वागत



**सुराज्य/सोलापूर**

**गेल्या २० वर्षांची परंपरा कायम राखत इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूल्सने, २१व्या वर्षी गणरायाचे जल्लोषात स्वागत केले. घोडे असलेल्या व सुंदर सजवलेल्या बग्गीतून श्रीगणरायाची मिरवणूक आयटीआय, कोर्ट कॉलनी येथून सुरू झाली. मिरवणुकीच्या सुरुवातीला आ. सुभाष देशमुख यांच्या हस्ते व इंडियन मॉडल स्कूलचे अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी व सचिवा सायली जोशी यांच्या हस्ते 'श्रीं'चे पूजन करण्यात आले.**

यावर्षी सोलापूर दर्शन ही संकल्पना यावर्षीच्या मिरवणुकींचे वैशिष्ट्य होते. एकूण ५५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. आषाढीवारीचे महत्त्व सांगत मॉडेल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेश धारण करत टाळ-मृदुंगावर ठेका धरला. त्याचप्रमाणे याच प्रशालेच्या विद्यार्थिनींनी पारंपारिक मंगळागौरीच्या खेळाचे सादरीकरण केले. विठूराया आणि रुक्मिणी मातेचे चंद्रभागा नदीसहीत असलेले जवळपास ५ फुटी कट-आऊट व वारकरी वेशात असलेले मुले सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई.) च्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी लेझीमचे सादरीकरण केले. इंडियन मॉडेल स्कूल (स्टेट बोर्ड) च्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी झांज व झेंड्याचे सुंदर सादरीकरण केले. तर तिन्ही शाळांतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पुणेरी ढोल पथकाचे सादरीकरण करत गणरायाचे जल्लोषात स्वागत केले. पुणेरी ढोल पथकामध्ये नऊवारी साडीतील पारंपरिक वेशभूषा केलेल्या विद्यार्थिनी शोभून दिसत होत्या. त्याचसोबत ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थांच्या प्रतिकृतीचे हुबेहूब दर्शन या मिरवणुकीत करण्यात आले. प्रत्यक्ष अक्कलकोट क्षेत्री आल्याचा भान निर्माण झाला.या वेशभूषाही आकर्षक दिसत होत्या. वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, खेलेगा इंडिया तभी तो बढ़ेगा इंडिया, लेक वाचवा लेक घडवा, चांद्रयान-३, फलक, बेटी बचाओ, निसर्गाचे संवर्धन करा तसेच स्वच्छतेचे महत्व इ. सामाजिक, संदेश देणारे फलक विद्यार्थ्यांनी हातात घेतले होते. कोर्ट कॉलनी इथून निघालेली ही मिरवणूक. भारती विद्यापीठ, विजय नगर, पतंजली मार्ट, डी मार्ट या मार्गाने येथून, इंडियन मॉडेल स्कूल येथे श्रीगणरायाची प्रतिष्ठापना आरती होऊन विसर्जित झाली. या मिरवणुकीची



सगळ्या देखाव्यांबरोबरच विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवाचे जनक लोकमान्य टिळक, चार हुतात्मे, नऊवारी साडीतील मुली, मावळे, बाराबंदी घातलेली मुले यांच्या संकल्पना इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूल्सच्या सचिवा सायली जोशी यांची होती. यावेळी साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सौ. सायली जोशी मॅडम, ईशा व आर्य व मनोज साळुंखे उपस्थित



### या मान्यवरांची होती उपस्थिती

आमदार सुभाष देशमुख, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, बोराडे, कबाडे, अतिरिक्त पो. उपायुक्त, हिम्मतराव जाधव व पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या वैशाली कडूकर.

जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेत आल्यानंतर गणरायाची प्रतिष्ठापना व पूजा सोलापूरचे पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्या हस्ते संपन्न झाली.

यावेळी इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूल्सचे प्राचार्य अपर्णा कुलकर्णी, ममता बसवंती, अचला राचर्ला, अदिती कुलकर्णी, सुजाता बुट्टे, मानसी जोशी, स्वाती कारंडे, गौरी दातार, रुही काझी, प्रा. प्रवीण देशपांडे होते. मिरवणुकीतील सुंदर देखावे तयार करण्याचे श्रेय शाळेतील कला शिक्षक अनिल रॉय, शैलेश कुलकर्णी, निलेश क्षीरसागर व दिपक पाटील यांना जाते. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूल्सचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रशांत पुणेकर, अभिजीत सोनके, नितीन बिराजदार, रमेश अंजिखाने, सुनील फुलवाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दिव्यांगाच्या दारी अभियानाचा लाभ घ्यावा : आयुक्त

**सुराज्य/सोलापूर**



महानगपालिका व समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधवासाठी दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी हे अभियान श्री सिद्धेश्वर साखर कारखान होटगी रोड येथील कर्मवीर काडादी मंगल कार्यालय यथे दि. २० सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता आयोजित केले आहे.

दिव्यांग व्यक्तींना कार्यक्रमाच्या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी एसटी स्टँड गेटच्या शेजारी, रेल्वे स्टेशन, सात रस्ता, तुळजापूर नाका पुलाखाली तसेच अक्कलकोट नाका पाण्याची टाकी या ठिकाणाहून सोलापूर महापालिकेच्यावतीने मनपा परिवहन विभागाची मोफत बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी सोलापूर शहरातील दिव्यांग बांधवांनी शासनाच्या या विविध योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.



## पदाचा वापर पक्षवाढीसाठी करावा : गायकवाड

**सुराज्य/वेळापूर**

रिपब्लिक पक्षाचे ध्येय धोरण सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचले पाहिजे. गाव तेथे शाखा निर्माण झाली पाहिजे. क्रियाशील सभासद वाढले पाहिजेत पक्ष संघटना मजबूत झाली पाहिजे. पदाचा वापर मिरवण्यासाठी नाही तर पक्ष संघटना वाढीसाठी करावा, असे प्रतिपादन एस. एम. गायकवाड यांनी केले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ रामदास आठवले यांच्या आदेशानुसार रिपाइं प्रदेशाध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली माळशिरस तालुका रिपाइंच्यावतीने गाव तेथे शाखा, 'रिपब्लिकन पक्ष आपल्या दारी' या अभियानांतर्गत गाव भेट दौऱ्यामध्ये ५१ गावांना भेटी देऊन सातवा टप्पा पूर्ण करण्यात आला. याप्रसंगी मांडवे, लोणंद, गिरवी, भाम जाधववाडी, भांबुर्डी, इत्यादी गावांना भेटी देण्यात आल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, रमेश धाईंजे, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, तालुका उपाध्यक्ष शेखर सावंत, अरविंद भोसले, तालुका उपाध्यक्ष महादेव गायकवाड, युवक ता. सचिव राजरत्न नाईकनवरे, वेळापूर युवक अध्यक्ष स्वप्निल सरवदे, दादासो बोडरे आदी उपस्थित होते.

## श्रीगणेश संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड

**सोलापूर** : सोलापूर लष्कर भागातील श्रीगणेश मंगलमूर्ती बहुउद्देशीय संस्था सन २०२३-२४ या वर्षाकरिता नुतन पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने झालेली आहे.

अध्यक्ष अमोल विठ्ठल भोसले, उपाध्यक्ष राजू प्रतापसिंग बडूरवाले, सचिव दीपक काटेवाले, सहसचिव मुकेश माने, खजिनदार आकाश फटफटवाले, कार्याध्यक्ष उदय अंबेवाले, डेकोरेशन प्रमुख रमेश तरंगे, महेश दवेवाले, टिपरीप्रमुख गजेंद्र बोरलेवाले, दत्ता लंगडेवाले, लेझीम प्रमुख किरण मैनावाले, अमर फटफटवाले, मिरवणूक प्रमुख राणुसिंग बडूरवाले, गणेश बाबावाले, गणेश सकी, उद्धव बडूरवाले, बाब्या अंबेवाले, आधारस्तंभ प्रतापसिंग बडूरवाले, आनंद मनसावाले, संस्थेचे उपाध्यक्ष राजेश मोहनसिंग सकी आदींची निवड करण्यात आलेली आहे.

## नदाफ पतसंस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर** : नदाफ नागरी सहकारी पतसंस्था सोलापूरतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही सभासदांचे गुणवंत पाल्य तसेच नदाफ पिजारी समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात येणार आहे. तरी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात इ. १०वी, इ. १२वी व पदवी परीक्षेत ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत, स्वत:चा फोटो, आधारकार्ड झेरॉक्स इ. कागदपत्रांसह दि. २० सप्टेंबरपर्यंत नदाफ पतसंस्थेच्या १४४, नॅशनल कॉम्प्लेक्स डॉ. कोठाडीया हॉस्पिटलमागे सिद्धेश्वर पेठ, सोलापूर येथील कार्यालयात आणून द्यावेत, असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन म. सलीम हुसेनसाब नदाफ यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत 'ताराराणी'चा बोलबाला

**सुराज्य/सोलापूर**



कुर्डूवाडी येथे छत्रपती शिवराय कुस्ती संकुलात झालेल्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्था संचलित ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्राच्या खेळाडूंनी वर्चस्व राखले. १९ वर्षे वयोगटात ५० किलो वजनगटात वेदिका नंदकुमार शेंडे हिने, ५७ किलो वजनगटात सिद्धी विनोद शेळके, ५५ किलो वजनगटात प्रियंका लालासाहेब पराडे, ६८ किलो वजनगटात रोशनी ज्ञानेश्वर बोडके यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर १४ वर्षे वयोगटात ३९ किलो वजनगटात प्रगती सम्राट काळे, ५४ किलो वजनगटात शिवांजली जितेंद्र तुपे या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवला. कुर्डूवाडी येथे पार पडलेल्या स्पर्धेत सर्व वजनगटात ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकावून स्पर्धेत ताराराणीचे वर्चस्व निर्माण केले. प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल व या खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्राच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील व संस्थेचे कार्याध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील यांनी विजयी सर्व खेळाडू व प्रशिक्षकाचे अभिनंदन केले. अकलूजच्या ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्राने ग्रामीण भागातील खेळाडूंसाठी राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण उपलब्ध करून देत आहेत. या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून महिला मल्ल राष्ट्रीय स्तरावरील राज्यभरातील कुस्ती स्पर्धेत नावलौकिक मिळवत आहेत.

## उजनी धरणातून पाणी सोडण्यास मान्यता

### आ. शहाजीबापू पाटील यांचा पाठपुरावा



**सोलापूर** : आमदार शहाजीबापू पाटील यांनी पाठपुरावा केल्याने अखेर उजनी धरणातून पाणी सोडण्यास पालकमंत्र्यांनी मान्यता दिली आहे. पाऊस लांबणीवर गेला असल्याने सोलापूर जिल्ह्यामध्ये सध्या टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे सांगोला शहर तालुक्यासह पंढरपूर शहर व सोलापूर शहर पाणीपुरवठा करणाऱ्या योजना या उजनी धरणावर अवलंबून आहेत. धरण क्षेत्रावर पाऊस कमी पडल्यामुळे या योजनांसाठी अपुरा पाणीपुरवठा होत होता. परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी टंचाई निर्माण झाली होती.

१४ रोजी खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर व शहाजीबापू पाटील यांनी सांगोला पंचायत समिती येथे टंचाई आढावा बैठक घेत पाणीपुरवठा संदर्भात चर्चा केली होती.त्या अनुषंगाने आमदार शहाजी बापू पाटील यांनी तात्काळ सांगोला तालुक्यातील व शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असल्याचे सांगत जिल्हाधिकारी व पालकमंत्री विखे-पाटील यांच्याकडे पाणी सोडण्याची मागणी केली होती व सातत्याने पाठपुरावा करून यावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील पाणी सोडण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## गणेशोत्सवानिमित्त शुक्रवारपर्यंत वाहतूक मार्गात बदल

**सुराज्य/सोलापूर**

**गणेशोत्सवाला सुरुवात होत असून गर्दी टाळण्यासाठी शहरातील मुख्य बाजारपेठांमधील मार्गांवरील वाहतूक पर्यायी मार्गावरून वळविण्यात आली आहे. त्या मार्गावरील वाहनांसाठी २२ सप्टेंबरपर्यंत पर्यायी मार्ग उपलब्ध असणार आहे. पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी त्यासंबंधीचा आदेश काढला आहे.**

सोलापूर शहरात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा केला जातो. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची संख्या १२०० असून घरगुती गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना देखील मोठ्या प्रमाणावर होते. २१ सप्टेंबरला गौरी आवाहन असल्याने शहरातील मधला मारुती, टिळक चौक, कौंतम चौक, माणिक चौक व मंगळवार पेठ पोलीस चौकी या परिसरात वेगवेगळे साहित्य खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी होते हा दरवर्षीचा अनुभव आहे. त्यामुळे तेथे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी नवे आदेश काढले आहेत.

अपघात होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून त्या मार्गावरील वाहतूक गणेशोत्सव काळात बंद केली जाणार आहे. उत्सव काळात अत्यावश्यक सेवेतील पोलिस, रुग्णवाहिका अशी वाहने या मार्गावरून ये-जा करू शकतात, असेही आदेशात नमूद आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई होईल, असा इशाराही आयुक्तांनी आदेशातून दिला आहे.

दरम्यान, उत्सव काळात बंदोबस्तासाठी सोलापूर शहरात जवळपास १७०० पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे.

**हे मार्ग राहणार बंद**

सोलापूर शहराच्या मुख्य बाजारपेठांमध्ये सण-उत्सवानिमित्त ग्राहकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. त्यामुळे २२ सप्टेंबरपर्यंत टिळक चौक-मधला मारुती-कौंतम चौक-कुंभार वेस बलिदान चौक-मंगळवार पेठ पोलीस चौकी-चाटी गल्ली-बाळीवेसी हा मार्ग वाहतुकीसाठी बंद राहणार आहे.

**असा असेल वाहनांसाठी पर्यायी मार्ग**

गणेशोत्सव काळात माणिक चौक-समाचार चौक-कौंतम चौक-कुंभार वेस बलिदान चौक-मंगळवार पेठ पोलीस चौकी-चाटी गल्लीमार्गे बाळीवेस हा मार्ग वाहनांसाठी उपलब्ध असणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### मळोली सेवा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा

**वेळापूर** : मळोली विविध कार्यकारी सेवा संस्थेची ७६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा १६ सप्टेंबर रोजी चेअरमन सत्यजित जयसिंगराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे ज्येष्ठ सभासद श्रीमंत अनंता जाधव व ज्ञानेश्वर एकनाथ जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. सभेमध्ये संस्थेचे वार्षिक अहवाल संस्थेचे सचिव दीपक माळवदकर यांनी वाचन केले. संस्थेने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये संस्थेची वार्षिक उलाढाल ७ कोटी १५ लाख रुपये असल्याचे सांगत चालू वर्षासाठी संस्थेला १४ लाख ९४ हजार रुपये इतका नफा झालेला आहे. त्यामधून संस्थेच्या सभासदांना दिवाळी सणाकरीता १० टक्के प्रमाणे लाभांश वाटप करण्यात येणार असल्याचे संस्थेचे मार्गदर्शक संचालक पं. स. सदस्य रणजीतसिंह जाधव यांनी यावेळी जाहीर केले. सुरेश जाधव यांनी उपस्थित सभासदांचे आभार मानले. सभेस संस्थेचे व्हाईस चेअरमन मनोजकुमार जाधव, सुरेश जाधव, तज्ञ संचालक शिवाजी नानासो जाधव, अनंता जाधव, ज्ञानेश्वर जाधव, संभाजी जाधव, हरिदास जाधव, सर्व संचालक, जिल्हा बँक शाखेचे शाखाधिकारी सपकाळ, हंबीरे व सभासद उपस्थित होते.



### राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वेरीत रक्तदान शिबिर

**पंढरपूर** : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) शी संलग्नित असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून 'अभियंता दिना'चे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पदविका अभियांत्रिकीच्या जवळपास १५० विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ऐच्छिक रक्तदान केले.

या शिबिराचे उद्घाटन ब्लड बँकचे सचिव अमजदखान पठाण यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ व इतर प्राध्यापकांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मल्लिकार्जुन ब्लड बँकेतर्फे रक्त तपासणी, हिमोग्लोबिन व रक्तगट अशा तपासण्या मोफत स्वरुपात करण्यात आल्या. यामध्ये डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थिनी व प्राध्यापिका असे मिळून एकूण ५० जणांनी या मोफत तपासणी शिबिराचा लाभ घेतला. तसेच यावेळी सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.



### कारुंडे सोसायटीचे चेअरमन तानाजी पाटील यांचा सत्कार

**वेळापूर** : गरुड बंगला, वेळापूर येथे कारुंडे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, कारुंडे (ता. माळशिरस) चेअरमनपदी तानाजी पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व अकलूज मार्केट कमिटीचे संचालक उत्तमराव जानकर यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच हनुमंत पाटील, माजी चेअरमन सोसायटी सूर्यकांत पाटील, माजी सरपंच अमोल पाटील, दिलीप रुपनवर, आप्पाजी पाटील, किसन झंजे, काशिनाथ माने, अमोल पनासे, रणजीत सरवदे आदी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी नागरिकांना एक तास भेटणार

**सोलापूर** : अभ्यागतांनी कार्यालयीन कामकाजी दिवसांमध्ये सोमवार ते शुक्रवार दररोज सायंकाळी ५.०० ते ६.३० या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या भेटीसाठी येणाऱ्या अभ्यागतांनी निश्चित केलेल्या वेळेतच जिल्हाधिकारी यांची भेट घ्यावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी कार्यालयाव्दारे करण्यात आले आहे.

# अल्पवयीन मुलीचा विवाह; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

१५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे तिच्या आईनं मुलीपेक्षा दुप्पट वयाच्या नात्यातील तरुणाशी लग्न लावून दिलं आणि माहेरी ठेवलं. नवऱ्या मुलानं पीडितेचे लज्जास्पद वर्तन केल्यानं त्याच्याविरुद्ध विनयभंग, बाललैंगिक अत्याचार कायद्यान्वये गुन्हा नोंदला तर अन्य सहा जणांविरुद्ध बालविवाह कायद्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदला आहे. शहरातील एका भागात ही घटना सोमवारी रात्री उघडकीस आली.

यातील फिर्यादी ही शहरातील एका भागात राहण्यास आहे. तिचे दीर शहरात फिरस्ती असून, त्याची पत्नी (फिर्यादीची जाऊ) ही तिच्या १५ वर्षाच्या मुलीसोबत सांगली येथे राहण्यास आहे. फिर्यादीच्या जाऊने सासरी कोणालाही खबर न देता नात्यातील एका तरुणाशी तिच्या अल्पवयीन मुलीशी ८ जून २०२३ रोजी लग्न लावून दिले आणि सांगलीला निघून गेले. या काळात लग्न झालेल्या तरुणानं अल्पवयीन मुलीशी लज्जास्पद वर्तन केले. पीडित मुलीला लग्नानंतर स्वतः कडे ठेवून १८ वर्षानंतर तिला माहेरी पाठवणार आहे, अशी माहिती पीडित मुलीने तिच्या फिर्यादी चुलतीला दिली. त्यानुसार चुलतीने जाऊसह लग्नात उपस्थित असलेले नातलग, नवरा मुलगा अशा सहा जणांविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी तातडीने पाऊले उचलून बालविवाह कायदा, विनयभंग आणि बाललैंगिक छळाचा गुन्हा नोंदवला. नवऱ्या मुलाला अटक केली आहे.





**पत्नीचा छळ करत दिले हाकलून; पतीसह तिघांवर गुन्हा**

विवाह झाल्यानंतर पाच दिवसांनी सासरकडच्या मंडळींनी संगनमत करून फिर्यादी प्रतिभा कांबळे यांना तुझ्या आई-वडिलांनी संसारोपयोगी वस्तू दिल्या नाहीत. हुंडा दिला नाही असे म्हणत पत्नीवर संशय घेऊन घरातून हाकलून देत म्हणाले की, 'तुला संसार करायचा असेल तर माहेरून संसारोपयोगी वस्तू व दोन लाख रुपये घेऊन ये, अशी धमकी दिल्याप्रकरणी पतीसह तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २१ मे २०२३ ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी ठाणे येथे घडली. याप्रकरणी प्रतिभा राहुल कांबळे (वय-३५, रा. करुणा हौसिंग सोसायटी, कुमठा नाका) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती राहुल कांबळे, सासू मंगल कांबळे, नणंद क्षितिजा (सर्व- रा. ठाणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक इनामदार हे करीत आहेत.

**हळदी-कुंकूच्या कार्यक्रमाला गेल्यावर चोरट्याने फोडले घर**

सोसायटीतील हळदी-कुंकूच्या कार्यक्रमाकरिता गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत कपाटात ठेवलेली पाच हजार रुपये रक्कम चोरून नेली आहे. ही घटना १८ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वा एक ते अडीच वाजण्याच्या सुमारास इंद्रप्रस्थ फेज ३, साठे वस्ती, सोलापूर येथे घडली. याप्रकरणी स्वाती संतोष चिटाळकर (वय-३२, रा. इंद्रप्रस्थ फेज-३, साठे वस्ती) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास हवालदार वाल्मिकी हे करीत आहेत.

**ट्रकमधून मोबाईल पळवला**

मार्केट यार्ड येथे ट्रक पार्किंगमध्ये लावलेला असताना सोमनाथ साबळे यांच्या आयशर ट्रकमधून फिर्यादी राहुल चव्हाण व सोमनाथ देवकते या दोघांचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. ही घटना २२ ऑगस्ट रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास मार्केट यार्ड येथे घडली. याप्रकरणी राहुल पोपट चव्हाण (वय-३०, रा. अहमदनगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून विराज ऊर्फ पोपट हुसेनी कांबळे (वय-२३, रा. रमाबाई नगर, न्यू बुधवार पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

### हॉलमध्ये चक्कर येऊन पडल्याने मृत्यू

सुराज्य/सोलापूर

कार्यक्रमाच्या वेळी चक्कर येऊन पडल्याने सैपन ईलाही किणीकर (वय ३५ रा. भंडारकवठे ता. दक्षिण सोलापूर, सध्या रा. नवीन घरकुल) हे इसम उपचारापूर्वी मयत झाले. ही घटना लोकमान्य नगर परिसरातील हकीम हॉल येथे रविवारी घडली. सैपन किणीकर कर हे भाचीच्या कार्यक्रमासाठी हॉलमध्ये आले होते. रात्री १० वाजेच्या सुमारास ते चक्कर येऊन बेशुद्ध झाले होते. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

## उजनीतून कालव्यात पाणी न सोडल्यास उपोषणाचा इशारा

सुराज्य/वेळापूर

सध्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. हे टाळण्यासाठी उजनीतून उजवा व डावा कालव्यात पाणी सोडवे अन्यथा भीमा पाटबंधारे, शाखा तोंडले-बोंडले (ता. माळशिरस) येथे उपोषणास बसण्याचा इशारा बोंडले येथील विजयकुमार देशमुख यांनी लाभक्षेत्र प्राधिकरण सोलापूर यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



यावेळी माजी उपसरपंच दत्तात्रय जाधव, अविनाश माने-देशमुख, संजय माने-देशमुख आदी उपस्थित होते. उजनी उजवा व डावा कालव्यास एका आवर्तनास साधारणपणे ५ ते ६ टीएमसी पाणी लागते. तसेच नदीला जरी पाणी सोडले तरी धरण मायनसमध्ये जात नाही. त्यामुळे कालव्यास पाणी सोडण्यास कांही अडचण नाही. मागील वर्षी पाण्याचे योग्य नियोजन केले गेले नसल्याने आज शेतकऱ्यांवर अशा प्रकारचे संकट ओढावले आहे. लवकरात लवकर उजवा व डावा कालव्यात तात्काळ पाणी सोडावे. अन्यथा ३ ऑक्टोंबरपासून आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

### मोहोळ तालुक्यात १३८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

सुराज्य/मोहोळ

चालू वर्षी पाऊस नसल्याने दुष्काळजन्य परिस्थिती असूनही, मोहोळ तालुक्यात गणेश आगमनाची जोरदार तयारी सुरू आहे. नागरिकांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. चालू वर्षी पोलिसांच्या प्रबोधनामुळे ४६ ठिकाणी 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबवली आहे. तालुक्यात एकूण १९१ ठिकाणी गणेशाची प्रतिष्ठापना होणार आहे. गणेशोत्सव शांततेत पार पडावा यासाठी १३८ जणांवर विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे.

ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील गणेश मंडळे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहेत. शहरातील वन मॅन शो गणेश मंडळाने सतत आठ दिवस महिलासाठी व्याख्यानांचे आयोजन केले आहे. त्यात नामवंत वक्ते बोलावून महिलांच्या आरोग्या विषयी, आर्थिक सक्षमीकरण, नोकरी विषयक च्या संधी यासाठी प्रबोधन करण्यात येणार आहे. तर लकी ड्रॉ च्या माध्यमातून सतत आठ दिवस सोने-चांदी पैठणी यासह अन्य बक्षिसांचे नियोजन केले आहे

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी आंदोलन उभारावे लागणार : खांडेकर

सुराज्य/मोडनिंब

पदभरती आणि पदोन्नती प्रक्रिया शाळेच्या दृष्टीने खूप महत्वाची आहे. मुलांसाठी आणि शाळेसाठी शिक्षकेतर पद भरती करणे खूप मोठी गरज आहे. शिक्षकेतर पद भरती नसल्यास विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे मोठे नुकसान होत आहे. येणाऱ्या काळात शिक्षकेत्तर संघटनांच्या सर्वच मागण्यांसाठी राज्यात मोठे आंदोलन उभे करणार आहे, असे प्रतिपादन शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी व्यक्त केले.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा अध्यापक विद्यालय शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाची कार्यकारिणी सभा सोलापूर येथील हरिभाई देवकरण प्रशालेच्या कै. प्रतिभा पद्माकर देव कला सभागृहात पार पडली याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महामंडळाचे अध्यक्ष अनिल माने, महामंडळाचे सतीश नाडगौडा, मोरेश्वर वासेकर, गोवर्धन पांडुळे, श्रीशैल तळवार, शेजाळ, प्राचार्य कांबळे, संघटनेचे माजी अध्यक्ष मोहन मोरे, मोहन भोसले, माजी सचिव शामराव बागल, विद्यमान अध्यक्ष रविकांत सुर्वे, सहसचिव रत्नाकर लोंढे, कार्याध्यक्ष प्रकाश आळगे, उपाध्यक्ष थिटे, उपाध्यक्ष विभुते, कोष्याध्यक्ष महेश रामशेट्टी उपस्थित होते. खांडेकर यांचा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल आणि पांडुळे यांचा पीचडी मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रसन्न कोतुळकर यांची आणि सात सदस्यीय समिती निवडणूक प्रक्रियेसाठी नेमण्यात आली.

विजयकुमार माने, राजू वांगी, रमेश इडे, सुधाकर महिद्रकर, रवी कोरे, स्वामी, चेतन जाधव, धावने, बाजीराव क्षीरसागर, सुरेश नावडकर, लाटणे, मिसाळ आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल गावडे यांनी केले तर आभार मोरेश्वर वासेकार यांनी मानले.

## सद्गुरु कारखान्याकडून दुसरा हप्ता अद्याप थकीत

सुराज्य/पिलीव

सांगली जिल्ह्यातील राजेवाडी येथील श्री श्री सद्गुरु साखर कारखान्याने गत वर्षी गळीत हंगामात गाळपास आलेल्या उसास २५०० रुपये एवढा पहिला हप्ता दिला होता. महाराष्ट्रातील इतर सर्व कारखान्यांनी बैल पोळा किंवा इतर वेळी दुसरा हप्ता दिला आहे. मात्र, सद्गुरु कारखान्याने दुसऱ्या हप्ताविषयी कोणत्याही प्रकारचे अद्याप भाष्य केलेले नाही.

कारखाना सध्या पुढील गळीत हंगामाची तयारी करीत आहे त्यानिमित्ताने ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचे करार करण्यात आले आहेत. उसाच्या नोंदीही घेण्यात आल्या आहेत. पुढच्या आक्टोंबर महिनाअखेरीस कारखाने सुरू होतील असा अंदाज आहे. पण सद्गुरु कारखाना गेल्या वर्षी गाळपास आलेल्या ऊसास दुसरा हप्ता किती देणार का २५०० रुपयावर गुंडाळणार याकडे सभासद शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

यावर्षी पावसाळा संपत आला तरीही समाधानकारक पाऊस नाही यामुळे ऊसाचे क्षेत्र कमालीचे घटले आहे. प्रचंड दुष्काळी परिस्थिती यामुळे आहे हे ऊस जोपासणे कठीण झाले आहे. त्यातच यंदा आटपाडी येथील माणगंगा, सांगोला येथील कारखाना, सदाशिवनगर येथील शंकर सहकारी तसेच चांदापुरी येथील ओंकार कारखान्याने यंदा विस्तारीकरण करत विजनिर्मिती, डिस्टलरी यामुळे चांगला दर देण्याचे नियोजन केले आहे. यामुळे सद्गुरु साखर कारखान्यास ऊस मिळविण्यासाठी चांगला दर देणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सद्गुरु साखर कारखाना गतवर्षी गाळपास आलेल्या ऊसास निश्चितच चांगला दर देईल, अशी अपेक्षा आहे.

### चैतन्य सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील चैतन्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची, ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष रामचंद्र ऊर्फ नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली.


२०२२-२०२३ या अहवाल वाचन संस्थेचे सचिव व्यवस्थापक रघुनाथ नरळे यांनी अहवाल वाचन केले. संस्थेची एकूण वार्षिक उलाढाल दोन कोटी चौदा लाख बारा हजार रुपये एवढी असल्याचे सांगण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र ऊर्फ नानासाहेब देशमुख यांनी गरजूंनी छोट्या-मोठ्या उद्योगासाठी कर्जाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी दामोदर लोखंडे, नामदेव देशमुख, संग्राम पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे संचालक प्रा. तुकाराम पडळकर यांनी आभार व्यक्त केले. संचालक आरिफखान पठाण, तुकाराम पडळकर, संजय रोकडे, प्रभाकर वाघमारे, नामदेव देशमुख, जगन्नाथ करडे, विशाल पिसे, विठ्ठल भिसनज दामोदर लोखंडे, महादेव वाघमारे, महादेव तावरे, विजय माळी व सभासद उपस्थित होते.

## मोहोळ तालुक्यात गौरीच्या स्वागताची जय्यत तयारी

सुराज्य/चिखली

पारंपरिक पध्दतीने गुरूवार (दि.२१) रोजी, गौरींचे आगमन होणार आहे. यासाठी मोहोळ तालुक्यातील घराघरातील गृहिणींकडून मंगलमय वातावरणात तयारी सुरू करण्यात आली आहे. माहेरवाशीण म्हणून असलेल्या महालक्ष्मी तथा गौराई अनेक घरांमध्ये पिढ्यान्पिढ्या बसविल्या जातात. काही घरांमध्ये नवसाच्या तर काहीजण हौस म्हणून गौराई बसवितात. गणरायापाठोपाठ येणाऱ्या ज्येष्ठा आणि कनिष्ठा माहेरवाशीणींचे स्वागत म्हणजे महिलांसाठी मोठा जिव्हाळ्याचा विषय आहे. महालक्ष्मींच्या स्वागतासाठी महिलांची लगबग सुरु झाली आहे. काही घरांमध्ये पारंपरिक पद्धतीनुसार शाडूच्या, पितळीच्या तर काही ठिकाणी सात खंडांच्या रूपात गौरींचे आगमन



गुरूवारी होणार आहे. गौराईला मंगळसूत्र, नेकलेस, मोहनमाळ, नथ, झुबे, बिंदी, कंबरपट्टा, बाजूबंद अशा दागिन्यांचा साज असतो. गौराईला काठा पदराची किंवा जरीची साडी नेसवली जाते. बैठ्या आणि उभ्या अशा दोन प्रकारे गौराई बसविल्या जातात. या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे सासू-सुना मिळून एकदिलाने गौराईचे सेवा करतात. गौरीच्या आगमनानिमित्त घराची स्वच्छता करण्यापासून ते थेट त्यांच्यासाठी वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थांची मेजवानी आणि रेखीव, कलाकुसरीच्या दागिन्यांची भेट देऊन महिला महालक्ष्मींच्या आगमनाची वाट पाहत आहेत. घरांमध्ये गौराईचे आगमन झाल्यानंतर हळदीच्या ठशांनी चंदनाचे बोट लावलेल्या पावलांचे ठसे घटभर उमटवत गौराईची शुक्रवारी ( दि. २२) रोजी पंचपक्वान्नयुक्त जेवणाचा बेत गौराईसाठी असेल.

गोडधोड जेवण करून शनिवारी (दि. २३) रोजी गौराईचे विसर्जन केले जाणार आहे. गौरींच्या स्वागतासाठी बाजारपेठा देखील फुलल्या असून गौरींना सजविण्यासाठी नवीन साड्या, दागिने, फराळाचे पदार्थ, सजावटीचे साहित्य, याशिवाय फुलांच्या माळा, मखरे, रांगोळ्या आदींच्या खरेदीसाठी महिलांची रेलचेल सुरू असल्याचे दिसून येत आहे.

सुराज्य Classified

पाहिजेत

व्यंकटेश्वरा मॅटर्निटी होम-सिस्टर, मावशी पाहिजेत.
मो. नं. ९४०५५४४७२२,
(210923)

● पाण्याच्या टाक्या धुणे (टॅन्क क्लीन) साठी अनुभवी कामगार पाहिजेत. संपर्क : देवस्थळी, घ. नं. ५६०/१३, विष्णू भुवन, दक्षिण सदर बझार, सोलापूर हौसिंग सोसायटी (अर्ज आणून द्यावा) (280923)

# सांगोला शहर-तालुक्यात ८७८ लोकांवर प्रतिबंधक कारवाई

सुराज्य/सांगोला

सांगोला शहर व तालुक्यात गणेशोत्सव व ईद-ए-मिलादुन्नबी हा सण शांततेत साजरा व्हावा याकरता सांगोला पोलीस स्टेशन कडून हद्दीतील सीआरपीसी १४९ सह विविध कलमान्वये सुमारे ८७८ लोकांवर प्रतिबंधक कारवाई केली आहे. मागील ५ वर्षांत गणेशोत्सव काळात दाखल गुन्ह्यातील सुमारे ३८ लोकांना १४४ (२) प्रमाणे गणेशोत्सव काळात परिसर सोडून जाणेबाबत उपविभागीय दंडाधिकारी मंगळवेढा यांनी तडीपार केले आहे.

सांगोला शहर व तालुक्यात मंगळवार १९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत सार्वजनिक गणेशोत्सवास साजरा होत आहे तर सांगोला पोलीस स्टेशन हद्दीत एकूण २६० सार्वजनिक गणेश मंडळाची नोंदणी झाली असून, सर्व गणेश मंडळांनी ऑनलाइन परवानगी घेतली आहे. दरम्यान सांगोला पोलीस स्टेशन हद्दीत गणेशोत्सव काळात सार्वजनिक शांततेस बाधा येऊ नये, गणेशोत्सव शांततेत पार पडावा या म्हणून सांगोला पोलीस स्टेशनकडून सीआरपीसी १४९ प्रमाणे २२६, १०७ प्रमाणे ५०७ व ११९ (ईग) नुसार-५३ लोकांना





तसेच मुंबई पोलीस कायदा कलम अंतर्गत ५६ प्रमाणे ५८ लोकांना प्रतिबंधक कारवाईची नोटीस बजावली आहे. गणेश मंडळांनी पोलीस कायदा व नियमांचे काटेकोरपणे पालन करून अनावश्यक खर्च टाळून प्रबोधनात्मक देखावे, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन सांगोला पोलीस स्टेशनच्यावतीने केले आहे.

सांगोला शहरात गणेश उत्सव आणि ईद-ए-मिलादुन्नबी सणानिमित्त सांगोला पोलीस स्टेशनतर्फे शांतता कमिटीची बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकिस बाबूराव गायकवाड हाजी शब्बीर भाई खतीब खंडू सातपुते, अरविंद केदार, बापू ठोकळे, सुभाष इंगोले, सुरज बनसोडे, रवींद्र कांबळे, किशोर बनसोडे, आयाज मनेरी यांच्यासह पोलीस पाटील शांतता कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

**सण शांततेत साजरे करा : पो. नि. कुलकर्णी**

सांगोला पोलीस स्टेशन हद्दीत गौडवाडी, बुद्धेहाळ, शिरभावी, वझरे, वाणीचिंचाळे, राजुरी, देवळे, बागलवाडी, हटकर मंगेवाडी या गावात 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबवली जात आहे. सध्या दुष्काळाचे सावट असून सर्व गणेश मंडळांनी त्याचे भान ठेवून सर्वांनी डॉल्बीमुक्त शांततेत गणेशोत्सव साजरा करावा, असे पो. नि. अनंत कुलकर्णी यांनी सांगितले.

# मराठा समाजाला कुणबीचे प्रमाणपत्र देण्याबाबत सरकारची तयारी

सुराज्य/मुंबई

**मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीला राज्य सरकारने कर्मचारीवर्ग उपलब्ध करून दिला आहे. सामान्य प्रशासन विभागाने सोमवारी या संदर्भातील शासन निर्णय जारी केला. त्यानुसार सरकारने समितीसाठी विविध विभागातील २० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या अधिकारी-कर्मचाऱ्यांची सेवा समितीचे कामकाज संपेपर्यंत समितीकडे वर्ग करण्यात आली आहे.**



मराठा समाजाला कुणबी जातीचे दाखले मिळावेत, या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण केले होते. या आंदोलनाची दखल घेऊन राज्य सरकारने मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीला अहवाल देण्यास एका महिन्याची मुदत देण्यात आली आहे. ही समिती महसूल, शैक्षणिक आणि संबंधित नोंदी तपासून मागणीनुसार निजाम काळातील कुणबी' नोंदी असलेल्या मराठा समाजाला कुणबी' प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया निश्चित करणार आहे; तसेच अशा प्रकरणांची वैधानिक आणि प्रशासकीय छाननीही समिती करणार आहे.

या पार्श्वभूमीवर विहित कालावधीत समितीचे काम व्हावे यासाठी सरकारने विविध विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सेवा या समितीकडे वर्ग केल्या आहेत. हे अधिकारी आणि कर्मचारी समितीच्या कामकाजाच्या अनुषंगाने बैठका आयोजित करणे; तसेच इतर कार्यालयीन कामकाज करण्यासाठी समितीला मदत करणार आहेत. सेवा वर्ग केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये एक उपसचिव, दोन अवर सचिव, तीन कक्ष अधिकारी, पाच सहायक कक्ष अधिकारी, चार लिपिक-टंकलेखक, एक स्वीय सहायक, दोन मराठी लघुलेखक, एक इंग्रजी लघुलेखक आणि एक शिपाई यांचा समावेश आहे. समितीला कर्मचारी उपलब्ध झाल्याने समितीच्या कामाला गती येणार आहे.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...



### गणेशोत्सवाच्या पंतप्रधानांच्या मराठमोळ्या शुभेच्छा

**मुंबई** : महाराष्ट्रासह संपूर्ण देशात गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. घरोघरी तसंच सार्वजनिक गणेश मंडळात गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत.गणेशोत्सवाच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. त्याही मराठमोळ्या स्टाईलमध्ये. सर्व देशवासियांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा, गणपती बाप्पा मोरया, असं ट्वीट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. तसंच, गणपती बाप्पाचं दर्शन घेतानाचा एक फोटोदेखील मोदी यांनी शेअर केला आहे. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे दौऱ्यावर होते त्यावेळी त्यांनी पुण्यातील दगडू गणपती मंदिरात जाऊन गणपती बाप्पाचं दर्शन घेतलं होतं. त्यावेळी काढलेला फोटो मोदी यांनी ट्वीटरवर शेअर केला आहे.

### वाघाची कातडी विकणाऱ्या तिघांना अटक

**वाई** : वाघाचे कातडी विकणाऱ्या महाबळेश्वरच्या तिघांना मुंबईत अटक करण्यात आली आहे. बोरीवली येथील एलआयसी मैदान परिसरात वाघाचे कातडी आणि वाघ नखे विकणाऱ्या तिघांचा यात समावेश आहे. त्यांच्याकडून ११४ सेमी लांब १०८ सेमी रुंद आणि बारा वाघ नखे असा दहा लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे वन्यजीव कायदा नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. संदीप आनंदराव परीट यांनी फिर्याद दिली असून सुरज लक्ष्मण कारंडे (वय ३०, रा. बिरवाडी ता. महाबळेश्वर) मोहसीन नजीर जुंद्रे (वय ३५, रा.रांजणवाडी महाबळेश्वर) व मंजूर मुस्तफा मानकर (वय ३६ रा. नगरपालिका सोसायटी महाबळेश्वर ) अशी संबंधित आरोपींची नावे आहेत.

### शासकीय योजनेत सिडकोची आर्थिक फसवणूक

**नवी मुंबई** : ग्रामीण भागात केंद्रशासनाच्या योजनेची अंमलबजावणी न करताच एका संस्थेने सिडको कडून ७९ लाख ४९ हजाराची रक्कम वसूल केली. एवढी रक्कम दिल्यावर संबंधित संस्थेने कुठलीही हालचाल न केल्याचे निदर्शनास आल्यावर संबंधित संस्था चालक विरोधात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा सीबीडी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. ही संस्था नाशिक येथील आहे. कैलास आढाव असे यातील आरोपींचे नाव आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना हि केंद्र सरकारची असून त्यात केंद्राचा ६० तर राज्याचा ४० टक्के असा सहभाग आहे.

### किरकोळ कारणावरुन गायकाची हत्या

**वसई** : वसईतील एका लॉज मध्ये उतरलेल्या हैदराबाद येथील गायकाची हत्या रविवारी दुपारी हत्या करण्यात आली. राधाकृष्ण व्यंकटरमन (५८) असे या हत्या झालेल्या गायकाचे नाव आहे. याप्रकरणी लॉज मध्ये उतरलेल्या राजू शहा नावाच्या वाहन चालकाला पोलिसांनी अटक केली. गायक राधाकृष्ण व्यंकटरमन (५८) हैदराबादला राहतात वसईतील एका लग्नामध्ये गाणे गाण्यासाठी ते आले होते. वसई मधील यात्री लॉज मध्ये त्यांनी मुक्काम केला होता. याच लॉजमध्ये राजू शहा नावाचा वाहनचालक उतरला होता. हे दोघे एकाच रूममध्ये राहत होते. रविवारी दुपारी किरकोळ गोष्टींवरून दोघांमध्ये वाद झाला. यावेळी राजू ने जवळच असलेल्या चाकूने व्यंकटरामन यांची हत्या केली. लॉज मधील कर्मचाऱ्यांनी तात्काळ पोलिसांना पाचारण केले.

### धनंजय मुंडे यांचा लातूरकरांना हिसका

**लातूर** : मराठवाड्यातील मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सोयाबीन संशोधन केंद्र व देवणी, लाल कंधारी या गोवंशाचे संशोधन केंद्र परळीला हलवून लातूरकरांना हिसका दिला. या विषयावर लातूरकर चांगलेच अस्वस्थ झाले आहेत. संपूर्ण देशात सोयाबीन उत्पादनात लातूर अग्रेसर आहे. लातूरहून सोयाबीन तेलाचे भाव ठरतात. दोन वर्षांपूर्वी तत्कालीन कृषिमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत लातूरच्या कृषी महाविद्यालयात सोयाबीन परिषद झाली होती, तेव्हा सोयाबीन संशोधन केंद्र लातूरला व्हावे अशी मागणी पुढे आली होती व त्याला सकारात्मकता दर्शवण्यात आली होती. माजी कृषी मंत्री सत्तार यांनीही लातूरला सोयाबीन संशोधन केंद्र व्हायला हवे असे मत व्यक्त केले होते. धनंजय मुंडे कृषी मंत्री होताच त्यांनी हे केंद्र परळीला हलवले आहे.

### मेडिकल चालकाकडून नशेच्या गोळ्यांची विक्री

**धाराशिव** : नशेच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या एका मेडिकल चालकावर अन्न औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईनंतर धाराशिव जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. उमरगा येथील मेडिकल दुकानामधून झोपेची औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याविना विकली जात असल्याची माहिती अन्न औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. त्यानंतर या मेडिकल दुकानात पोलीस व अन्न औषध प्रशासन विभागाच्या संयुक्त पथकाने धाड टाकून १ लाख ४० हजार रुपयाचा अवैध औषधसाठा जप्त केला आहे. विशेष म्हणजे या मेडिकल चालकाने आतापर्यंत १९ हजारांवर नशेच्या गोळ्यांची विक्री केल्याचे तपासात समोर आले आहे. तर, या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात मेडिकल दुकानदाराविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गणेश गोविंद माने असे आरोपीचे नाव आहे.

### राज्याबाहेर ऊस पाठवण्यावर घातलेली बंदी उठवली

**कोल्हापूर** : राज्यातील ऊस परराज्यात घालवण्यावर घातलेली बंदी आता राज्य सरकारने उठवली आहे. सहकार मंत्री आणि शेतकरी संघटनांमध्ये पुण्यात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यंदाच्या मोसमात राज्यातील ऊसाची तोळामासाची परिस्थिती पाहता राज्यातील साखर कारखानदारांकडून परराज्यातील कारखान्यांना ऊस घालण्यास बंदीचे आदेश देण्यात आले होते. मात्र या निर्णयाला शेतकरी संघटनांनी कडाडून विरोध केला होता.

### कांदा करणार पुन्हा वांदा

**नाशिक** : कांद्याचा प्रश्न पुन्हा एकदा पेटणार आहे. केंद्र सरकारने नाफेड व एनसीसीएफ मार्फत साठवून ठेवलेला ५ लाख टन कांदा हा रेशनवर विक्री करावा तसेच दैनंदिन मार्केट मध्ये देखील कांदा २४१० व त्या पेक्षा अधिकच्या दराने खरेदी करावा, देशांतर्गत वाहतुकीवर सरसकट ५० टक्के सबसिडी द्यावी अशा आदी मागण्यांसाठी जिल्ह्यातील कांदा व्यापार्यांनी बुधवारपासून बाजार समित्यांच्या कांदा लिलावात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकार्यांना निवेदन देण्यात आले.नाशिक जिल्हा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष खंडू देवरे यांनी या बैठकीत कांदा व्यापार्यांच्या समस्या व केंद्र सरकारकडुन होत असलेल्या अन्यायाबाबत जिल्हाधिकारी जलज शर्मा व जिल्हा उपनिबंधक फैयाज मुलानी यांना निवेदन दिले.

## आवतान नसताना बिबट्या पार्टीला आणि पोरे सुसाट गावाकडे धावली

**सांगली** : श्रावणाची अमावस्या झाली. गावातल्या आठ-दहा पोरांचा पार्टीचा बेत ठरला. ठिकाणही ठरले. तीन दगडाच्या चुलीवर मटणही रटरटत होते आणि डोंगरकपारीला झाडाच्या आडोश्याला दोन डोळे दिपले. ते डोळे होते बिबट्याचे!. पार्टीला आवतान न देता बिबट्या आल्याने पळता भुई थोडी अशी गत होऊन गाव कधी गाठले हे पार्टीच्या नादात जमलेल्या पोरांना कळलंच नाही.

वाळवा तालुक्यातील मरळनाथपूर येथील तरूणांनी श्रावणातील सणवारामुळे मांसाहर वर्ज्य केला होता. रोजचे शाकाहारी खाऊन खाऊन कंटाळा आल्याने सामिष पार्टीचे आयोजन करण्याचे ठरले. रविवारी रात्रीच्या पार्टीसाठी जागाही डोंगरकपारीची निवडण्यात आली. पार्टीसाठी मटण, मसाला, तेल, वाटण, पाणी आणि भांड्याची व्यवस्थाही करण्यात आली. काही पोरं जेवणाच्या तयारीसाठी कडूस पडल्यापासून तळावर जमली होती. तर काही जण गावाचा कारभार आटोपून थोडासा उतारा टाकूनच येणार होती. तीन दगडाची चूल मांडली.

चुलीवर मटण रटरटत होतं. चुलीतून अग्निच्या ज्वाला बाहेर येत होत्या. या आगीच्या उजेडात कपारीच्या एका बाजूला असलेल्या झाडाजवळ दोन डोळे चमकले. पाहणाऱ्याने मित्राला बघण्यास सांगितले. सर्वांचेच एकमत झाले की लपून पार्टीला आलेला बिबट्याच आहे. मग काय? समद्यांचीच पाचावर धारण बसली. चुलीवर शिजणारं मटण रटरटतच होतं. सगळं तिथंच टाकलं. आणि बिबट्याच्या भीतीने गावची वाट धरली.

## मुंढेंच्या 'त्या' प्रस्तावामुळे मोरेंचा अध्यक्षपदाचा राजीनामा

सुराज्य/मुंबई



राज्याच्या साहित्य आणि संस्कृती मंडळा'चे रूपांतर संचालनालयात करण्याचा प्रस्ताव मराठी भाषा विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सादर केल्याने डॉ. सदानंद मोरे यांच्यासह त्यांच्या अध्यक्षतेखाली काम करणाऱ्या मंडळाने राजीनामा दिला आहे. मात्र, संचालनालयाच्या प्रस्तावावर चर्चा झाली नसून, मंडळाच्या सदस्यांचा राजीनामा स्वीकारला नसल्याची स्पष्टोक्ती मराठी भाषा मंत्री डॉ. दीपक केसरकर यांनी दिली.

यासंदर्भात सदानंद मोरे यांनी कोणत्याही अधिकाऱ्याचे नाव स्पष्टपणे घेतले नाही. मात्र मंडळाचे नाव बदला, स्वरूप बदला, कार्यपद्धती बदला, उद्दिष्टे बदला असे निर्णय परस्पर घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. असे निर्णय घेताना तज्ज्ञांशी चर्चा अपेक्षित असते, त्यामध्ये विचारविनिमय व्हायला पाहिजे मात्र हे होत नसल्याचेही त्यांनी सांगितले.

याविरोधात मंडळाच्या बैठकीमध्ये सगळ्यांनी ठराव केला असून तो सरकारला पाठवल्याचीही माहिती त्यांनी दिली. रस्ते बांधणे आणि पुस्तके निर्माण करणे यात फरक असतो. त्यामुळे अशा कामासाठी स्वायतत्ता असावी, त्यात हस्तक्षेप योग्य नाही असे मतही त्यांनी मांडले. गेली सहा दशके अबाधित असलेली यंत्रणा, साहित्य संस्कृती मंडळामध्ये कुणी अधिकारी आल्याने बदल होऊ नये, अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. असेच सुरू राहिले तर काम करणे अशक्य असल्याचेही त्यांनी पुन्हा स्पष्ट केले.

राज्याच्या मराठी भाषा विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या साहित्य आणि संस्कृती मंडळात सचिवांसह अशासकीय अध्यक्ष, सदस्यांचा समावेश असतो. मे २०२१मध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी मराठी भाषा विभागाने सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली ३० सदस्यांची नियुक्ती केली होती.

मंडळाच्या अंतर्गत कामकाजावरून मागील काही महिन्यांपूर्वी डॉ. सदानंद मोरे यांनी राजीनामा दिला होता. त्या वेळी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी भेट घेऊन, आश्वासन दिल्यानंतर डॉ. मोरे यांनी राजीनामा मागे घेतला होता. मात्र, साहित्य आणि संस्कृती मंडळाची रचना बदलणे, विभागातील अधिकाऱ्यांचा मंडळाच्या कामात वाढता हस्तक्षेप, मंडळाची स्वायत्ता नष्ट करण्याचे प्रयत्न आदी कारणांमुळे मोरे यांच्यासह साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सदस्यांनी राजीनामा दिला आहे.

## माझा कुणाशीही पर्मनंट करार नसतो : अब्दुल सत्तार




सुराज्य/छ.संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर: लोक मला विचारतात की, तुम्ही प्रत्येक मंत्रिमंडळात कसे असता? माझ्या नावात सत्ता असल्यामुळे मी सत्तेत असतो. आमच्या डबल इंजिन सरकारला आता तिसरे इंजिन जोडले आहे. मी सगळीकडे असतो कारण माझा कुणाशाही पर्मनंट करार नसतो. कारण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही,' असे वक्तव्य अल्पसंख्याकमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेला अल्पसंख्याकमंत्री अब्दुल सत्तार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार हरिभाऊ बागडे, माजी आमदार डॉ. कल्याण काळे आणि अण्णासाहेब माने उपस्थित होते.

बँकेच्या अध्यक्षपदी अर्जुनराव गाढे यांची नुकतीच निवड झाली आहे. सत्तार आणि गाढे यांचे राजकीय लागेबांधे पाहत दानवे यांनी भाषणातून सल्ला दिला. गाढे, कुणाचे शिक्काधारी होऊ नका. सत्तार यांच्या नादी लागू नका. एखाद्या कागदावर सही घेऊन ते तुम्हाला अडचणीत आणतील. ऐन वेळी ते त्याचे काम असल्याचे सांगून मोकळे होतील,' असा उपरोधिक सल्ला दानवे यांनी दिला. या सल्ल्यामुळे सभागृहात एकच हशा उसळला.

आम्हाला अपात्र ठरविण्यासाठी दानवे सारखे मागे लागले आहेत. मात्र, एखाद्याने गुन्हा केला असेल तर त्याला त्याचे भावना मांडण्याची मुभा असते. म्हणूनच हा देश लोकशाही आहे', असे सत्तार म्हणाले. सध्या कोण कुठल्या पक्षात आहे ते कळतच नाही. जे ट्रिपल इंजिन सरकारमध्ये आले त्यांच्या मतदारसंघात कामे सुरू आहेत,' असा दावाही सत्तार यांनी केला.

## काम करण्यास सांगितल्याने मुलाने केला बापाचा खून

**पुणे** : काम कर, चांगले रहा, असे सांगितल्याने मुलाने चिडून रात्री झोपलेल्या वडिलांवर कात्रीने वार करुन खून केल्याची घटना विश्रांतवाडी भागात घडली. यावेळी आईने रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या आईवरही मुलाने हल्ला करुन जखमी केले. लक्ष्मण सुरेश मंजुळे (वय ५५, रा. मास्टर कॉलनी, टिंगरेनगर) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी मुलगा शिवनाथ लक्ष्मण मंजुळे (वय २०) याला अटक करण्यात आली आहे. याबाबत शिवनाथचा मामा बाबू दांडेकर (वय ३६, रा. टिंगरेनगर) यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## जेईई, नीट, नेट परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**वर्धा** : एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा एजेन्सीने पुढील वर्षी होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या परीक्षांबाबत देशभरातील विद्यार्थ्यांना उत्सुकता लागून राहलेली असते. देशातील आयआयटी प्रवेशासाठी जे ई ई परीक्षा सर्वात महत्वाची असते. या परीक्षेचा पहिला टप्पा २४ जानेवारी ते १ फेब्रुवारी तर दुसरा टप्पा १ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान पार पडणार आहे.



५ मे रोजी नीट म्हणजे राष्ट्रीय पात्रता प्रवेश चाचणी परीक्षा होणार आहे. देशातील केंद्रीय विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी होणाऱ्या संयुक्त विद्यापीठ प्रवेश परीक्षा १५ ते ३१ मे दरम्यान होणार आहेत. तर पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी ११ ते २८ मार्च या कालावधीत होईल. युजीसी नेट ही परीक्षा १० ते २१ जून दरम्यान होत आहे. सविस्तर माहिती नोंदणी प्रक्रिया सुरू करताना दिल्या जाणार आहे. या सर्व संगणक आधारित परीक्षांचे निकाल परीक्षा झाल्यानंतर पुढील तीन आठवड्यात जाहीर होतील. तर नीट परीक्षेचा निकाल जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर होणार आहे.

## संत निवृत्तीनाथांच्या मंदिरात दानपेटीचा वाद

**नाशिक** : संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज देवस्थान वादात अडकले आहे. मंदिरातील दानपेटीतील उत्पन्नावरून वादाला सुरुवात झाली आहे. दान पेटीतून मंदिराच्या पुजाऱ्यांना मिळणारे उत्पन्न बंद करण्याची मागणी वारकरी प्रतिनिधींनी केली असून हा वाद धर्मदाय आयुक्त कार्यालयात गेला आहे. तर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे देवस्थानचा कारभार सुरू असल्याचा पुजाऱ्यांचा दावा आहे. दानपेटीतील मिळणाऱ्या उत्पन्नातून ४० टक्के वाटा गोसावी कुटुंबीयांना तर ६० टक्के वाटा देवस्थान ट्रस्टला दिला जातो. ट्रस्टकडून वार्षिक सण उत्सव, पालखी सोहळे, वीज बिलासह इतर प्रशासकीय खर्च पार पडले जातात. तर गोसावी कुटूंबीयांकडून देवाची नित्य पूजा, नैवेद्य, विणेकरी, पहारेकरी यांची भोजन व्यवस्था आणि इतर काम केली जातात. मात्र आता त्यांच्यात वाद सुरु झाला आहे.

## राज्यात आता 'शाळा दत्तक घेणार काय' योजना

**पुणे** : राज्यातील शासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी 'दत्तक शाळा योजना' राबवण्यात येणार आहे. ही योजना राबवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर आता शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, देणगीदाराला पाच किंवा दहा वर्षांसाठी शाळा दत्तक घेता येईल. राज्यातील शहरी, ग्रामीण भागात समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट ऑफिस आदींच्या सहकार्यातून शाळांसाठी पायाभूत सुविधा व आवश्यक संसाधनांची उपलब्धता वाढवून त्याद्वारे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार शिक्षणाचा प्रसार करण्याचा या योजनेचा मूळ उद्देश आहे. यात समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कंपन्यांना विशिष्ट शाळा दत्तक घेता येतील. या शाळेच्या गरजेनुसार त्यांना आवश्यक वस्तू व सेवांचा पुरवठा करता येईल. त्याचप्रमाणे अतिरिक्त वर्ग खोल्यांचे बांधकाम, इमारतींची दुरुस्ती, देखभाल व रंगरंगोटी या मार्गाचा देखील अवलंब करण्यास मुभा असेल.

## सगळी विघ्ने दूर होऊ दे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे गणरायाला साकडे



**मुंबई** : गणेश चतुर्थीच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. तसंच विघ्नहर्ता राज्यात पाऊस पाडेल आणि आनंदाची बरसात करेल अशी मला अपेक्षा आहे असंही त्यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रातील नागरिकांची स्वप्नं साकार करण्यासाठी मी गणरायाला साकडं घातलं आहे असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

## अवर्सेकरांवर सीबीआयचे छापे, ३८४७ कोटींचे कर्ज बुडवल्याचा आरोप

सुराज्य/मुंबई

मुंबई तसेच राज्यातील अनेक महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लावणाऱ्या युनिटी इन्फ्रा प्रोजेक्ट्स लिमिटेड आणि कंपनीच्या संचालकांविरोधात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) गुन्हा दाखल केला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियासह (एसबीआय) इतर १५ बँकांचे सुमारे ३८४७ कोटी रुपयांचे कर्ज बुडविल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. अनेक राजकीय पक्ष आणि नेत्यांशी जवळीक असलेल्या किशोर अवर्सेकर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर गुन्हा दाखल झाल्याने उलटसुलट चर्चा सुरू असून, उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानचेही त्यांनी नूतनीकरण केल्याने या कारवाईला आणखी महत्त्व आले आहे. या गुन्ह्यानंतर सोमवारी त्यांच्याशी संबंधित कार्यालये, निवासस्थानी छापेही टाकण्यात आले.



आरोपींनी लोकसेवक आणि काही इतर व्यक्तींच्या मदतीने गुन्हेगारी कट रचून स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर बँकांच्या समूहांची ३८४७ कोटी ५८ लाख रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार 'एसबीआय'च्या वतीने उपमहाव्यवस्थापक रजनी ठाकूर यांनी केली होती. युनिटी इन्फ्रा प्रोजेक्ट्स लिमिटेडने एसबीआय आणि इतर बँकांकडून विविध सुविधांद्वारे कर्ज घेतले होते. ते बुडीत निघाल्यामुळे बँकांचे सुमारे ३,८४७ कोटी रुपयांचे नुकसान झाले. त्यानंतर बँकांकडून न्यायवैधक लेखापरीक्षण करण्यात आले.

लेखापरीक्षण अहवालात गैरव्यवहार झाल्याचे उघड झाल्यानंतर याबाबत तक्रार करण्यात आली. या तक्रारीची प्राथमिक चौकशी केल्यानंतर सीबीआयने युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड, तिचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक किशोर अवर्सेकर, उपाध्यक्ष अभिजीत अवर्सेकर, कार्यकारी संचालक आशिष अवर्सेकर आणि संचालक पुष्पा अवर्सेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अवर्सेकर यांच्या युनिटी इन्फ्रा प्रोजेक्टस लिमिटेडने कलानगर येथील ठाकरे कुटुंबीयांचा मातोश्री बंगला, दादर टीटी उड्डाणपूल आणि सीएसएमटी येथील भुयारी मार्गाचे बांधकाम तसेच आगीत नुकसान झालेल्या मंत्रालयाच्या इमारतींचे नूतनीकरण केले होते.

### चार ठिकाणी छापे

सीबीआयच्या पथकाने गुन्हा दाखल केल्यानंतर सोमवारी अवर्से कर यांचे कार्यालय तसेच निवासस्थान अशा चार ठिकाणी छापे टाकले. या छाप्यांमध्ये काही महत्त्वपूर्ण कागदपत्रे हस्तगत करण्यात आल्याचे सीबीआयने म्हटले आहे.



कसबा गणपती मिरवणुकीचे उद्घाटन पालिका आयुक्त शितल तेली उगले यांच्या हस्ते करण्यात आले. सनई चौघडा, पंचरंगी झेंडा, बैल व घोड्यांची जोडी, युवकांच्या लेझीमचा सुंदर खेळ, लोकमान्य टिळकांचा फलक, हलग्या आणि पालखी अशा डामडोलात श्री कसबा गणपतीची मोठ्या उत्साही वातावरणात मिरवणूक काढण्यात आली.






आजोबा गणपतीची उत्साहात प्रतिष्ठापना करण्यात आली. श्रींचे दर्शन घेण्यासाठी दिवसभर भाविकांनी गर्दी केली होती.





## मोरया... मोरया... अन् ढोलताशांचा गजर, गुलालाची उधळण

# घरोघरी गणरायाचे धुमधडाक्यात आगमन

✔ सुराज्य/सोलापूर

**ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण, टाळ्यांचा नाद आणि मोरया... मोरयाच्या गजरात सोलापूर शहरात मंगळवारी घरोघरी गणरायांचे आगमन झाले. शहरात सकाळपासून बाप्पाच्या आगमनासाठी मोठा उत्साह पहायला मिळाला. रात्री उशिरापर्यंत विविध मंडळांनी मिरवणुका काढत गणेशाची प्रतिष्ठापना केली.**



सर्वांच्या लाडक्या विघ्नहर्ता, गणरायाचे मंगळवारी घरोघरी मंगलमय वातावरणात आगमन झाले. शहरात सर्वत्र गणपती बप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयचा जयघोष दिसत होता. शहरात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडूनही 'श्रीं' ची उत्साहात प्रतिष्ठापना करण्यात आली.

श्री गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर हिंदू बांधवांनी सर्वत्र गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना केली. यावेळी बच्चे कंपनीचा उत्साह ओसांडून वाहत होता.


आठवडाभरापासूनच गणेश मूर्ती सजावट व पूजेसाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी भाविकांची गर्दी होत होती तर मंगळवारी सकाळी शहरातील महत्त्वाच्या बाजारपेठ फुलून गेल्या होत्या.

सकाळपासूनच गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत ढोल ताशांच्या गजरात भाविकांनी गणेश मूर्तीची खरेदी केली. घरोघरी आपापल्या पसंतीनुसार विविध आकाराच्या बाप्पांना वाजत गाजत आणले. शहरातील ऑफिसेस, दुकाने आदी ठिकाणीही गणपतीची स्थापना करुन प्रत्येकजण आपापल्या परीने बाप्पांचे जोरदार स्वागत केले. शहरातील श्रीमंत मानाचा कसबा गणपती, श्री सदानंद समाज आजोबा गणपती ट्रस्ट, पाणीवेस तालीम, पत्रा तालीम, थोरला मंगळवेढा तालीम, वस्ताद गणपती, दशभुजा गणपती, अय्या गणपती, सुवर्ण गणपती युवक प्रतिष्ठान, दादा गणपती, छत्रपती ग्रुप शेकडो मंडळांनी बाप्पांची उत्साहात प्रतिष्ठापना केली.

यातील श्रीमंत मानाचा श्री कसबा गणपती मंडळासह काही मंडळांनी मिरवणूक काढून बाप्पांना विराजमान केले. यावेळी कसबा गणपतीच्या पथकाने बहारदार लेझीमचे डाव सादर केले.

**बाजारपेठेत मोठी गर्दी :** शहरातील नवीपेठ, मधला मारूती, टिळक चौक, आसरा चौक, हत्तुरेवस्ती, जोडबसवण्णा चौक, आसरासह पूर्वभागातील बाजारपेठा भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्या होत्या. संपूर्ण दिवसभर गणेशाची मूर्ती आणि पूजेचे साहित्य खरेदीसाठी मोठी गर्दी बाजारात दिसून आली.

**पोलिसांची भक्तांना मदत :** आपल्या लाडक्या गणरायाला अनेकांनी चारचाकी वाहन, ऑटोरिक्षातून घरी नेले. काहींनी दुचाकी आणल्या होत्या. दुचाकीवर मागे बसणाजयांच्या हातात मूर्ती ठेवायचे असे नियोजन होते. मात्र मूर्ती घेऊन दुचाकीवर बसताना अनेकांना अडचणीचे ठरत असल्याचे बघून पोलीस यासाठी मदतीला धावून येताना दिसले. अनेक दुचाकीस्वारांना दुचाकीवर बसल्यानंतर पोलिसांनी मूर्ती त्यांच्या हाती दिली.



## ब्रह्मदेव दादा माने बँकेत श्रींची प्रतिष्ठापना

✔ **सोलापूर :** ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळातर्फे माजी आ. दिलीप माने यांच्या हस्ते गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. राज्यात पाऊस नसल्या मुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून हे विघ्न दूर करून सुख - शांती-समृध्दी नांदावी असे साकडे माने यांनी श्री गणेशाला घातले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष निलेश बाबर, सेवक संचालक चंद्रकांत म्हेत्रे, पांडुरंग झालटे, सुनील माळवदकर, अजित महावरकर, अनिल शिंदे, अनिल जाधव, आनंद भुईटे, लक्ष्मण केंगार, संजय कदम, प्रकाश होनकळसे, संतोष घोडके, राजेंद्र क्षीरसागर आदी उपस्थित होते.



## 'सुराज्य' कार्यालयात गणरायाची प्रतिष्ठपना

दै. 'सुराज्य' कार्यालयात सालाबादाप्रमाणे यंदाही 'श्री' ची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी व्यवस्थापकीय संपादक रोनीत टोळ्ये यांनी पूजा केली. पौरोहित्य भावार्थी यांनी केले.



## गणराया सर्वांचे जीवन सुखी कर : आ. शिंदे

✔ **सोलापूर :** महिला शेतकरी, दिन दलित, वंचित आणि सर्वांच्या सर्व मागण्या पूर्ण होऊ दे, लोकशाही, लोकांचा आवाज आणि संविधान पुन्हा एकदा खंबीर होऊ दे , असे साकडे आ. प्रणिती शिंदे यांनी गणरायाला घातले. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, आमदार प्रणितीताई शिंदे यांच्या मुंबई येथील निवासस्थानी गणरायाची मूर्ती प्रतिष्ठापना थाटात संपन्न झाली, त्यावेळी आ. शिंदे यांनी गणेशाला साकडे घातले.

## रामवाडी हॉस्पिटल येथे 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना

✔ सुराज्य/सोलापूर

गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरयाच्या गजरात सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथील रामवाडी हॉस्पिटल यूपीसी सेंटर येथे सोलापूर महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते किसन जाधव यांच्या उपस्थितीत श्रींचह प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.




यावेळी यूपीसी सेंटरचे डॉक्टर अनिल पवार, डॉ. सुचिता माने, रामवाडी हॉस्पिटल यूपीसी सेंटरचे नर्सिंग स्टॉप पुनम जाधव रेखा जाधव कुमार जाधव, अनिता मावशी, महादेव राठोड, वसंत कांबळे, माणिक कांबळे, आशा मैंदर्गीकर यांच्यासह हॉस्पिटल मधील कर्मचारी उपस्थिती होते. प्रारंभी किसन जाधव यांच्या हस्ते श्रींची विधिवत पूजन होऊन महाआरती करण्यात आले.

यूपीसी सेंटर मधील डॉक्टर नर्सिंग स्टॉप व आशा वर्कर यांच्याकडून गोरगरीब रुग्णांची अखंड सेवा त्यांच्या हातून घडो, सर्वांचे आरोग्य निरोगी राहावं असं साकडं किसन जाधव यांनी लाडक्या गणरायांकडे याप्रसंगी घातलं.

## बार्शी शहरात वाजतगाजत गणरायाचे आगमन

✔ सुराज्य/बार्शी

बार्शी शहर व तालुक्यात घरोघरी व सार्वजनिक गणेश मंडळांनी गणपत्ती बाप्पा मोरया च्या जयघोषात श्री गणरायाला गुलालाची उधळण करत वाजतगाजत मिरवणूकीने आणून प्रतिष्ठापना केली. यावेळी गणेशभक्तांमध्ये उत्साह दिसून येत होता.

मंगळवारी गणेश चतुर्थीदिवशी बाप्पांचे आगमन झाले. शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर शॉपींग सेंटर जवळ, जैन मंदीराजवळ तसेच लातूर रोडवर शासकिय विश्रामगृहाजवळ अशा तीन ठिकाणी गणेश मूर्तीचे स्टॉल उभारण्यात आले होते. सकाळपासूनच मूर्ती घेण्यासाठी भक्तांची अलोट गर्दी दिसून येत होती. लातूर रोडवर सर्वाधिक गर्दी होती. बार्शी शहरासह तालुक्यातील गणेशभक्तांनी येथून मूर्ती नेवून प्रतिष्ठापना केली. वाहनातून मूर्ती नेताना बॅन्जोच्या तालावर गणेशभक्त थिरकताना दिसत होते. हलगीच्या तालावर नाचत गुलालाची मुक्तपणे उधळण करत गणरायाची वाजतगाजत नेवून प्रतिष्ठापना करण्यात आली. शहरातील काही मोठया मंडळांचे यंदाही देखावे असून लवकरच हे खुले करण्यात येणार आहेत. देखावे बनविण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे.

गणपती व लक्ष्मीच्या सणात कांही अपवाद वगळता सर्रास पाऊस पडलेला आहे. त्यामुळे गणपती बाप्पा पाऊस घेतील अशी आशा शेतकरी वर्गाला लागून राहिली आहे. विघ्नहर्त्या गणरायाला पाऊस पडू दे असेच साकडे गणेशभक्त घालत आहेत.



आ.विजयकुमार देशमुख यांनी आपल्या घरी श्रीची प्रतिष्ठापना कुटुंबासमवेत केली.



आ.सुभाष देशमुख यांनी आपल्या घरी श्रीची पूजा सपत्निक केली.